शनिवार ११ मार्च १९७८
७५ पैसे

# माणूस

कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि विदर्भ
येथील इंदिरा काँग्रेसचा विजय कशाचा निदर्शक ?
□ □
वर्षापूर्वी बदनाम झालेल्या नेतृत्वाचे पुनरागमन
की अस्तित्वासाठी अखेरची धडपड ?
□ □
साऱ्या देशाला अस्वस्थ करणाऱ्या या प्रश्नाचा शोध घेण्याचा प्रयत्न....

## या वादळाची दिशा कोणती ?
## मार्ग कोणता ?

रायबरेलीपासून बंगलोरपर्यंतच्या नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या
खास मुलाखतींवर आधारलेली वार्तापत्रे लवकरच प्रसिद्ध होत आहेत.
'माणूस' परंपरेला अनुसरून
आमचा विशेष प्रतिनिधी रायबरेलीच्या वाटेवर.

देशापुढील आर्थिक, सामाजिक कार्यक्रम, धोरणे व त्यांची
अंमलबजावणी यांची वस्तुनिष्ठ चर्चा करणारे व्यासपीठ

# योजना

## मराठी पाक्षिक

महाराष्ट्रातील सर्वसामान्य वाचक, शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी, अध्यापक व
प्राध्यापक यांच्या पसंतीस उतरलेले या प्रकारचे एकमेव पाक्षिक

## आजच वर्गणीदार व्हा

वर्गणी : वार्षिक रु. १०, द्वैवार्षिक रु. १७ व त्रैवार्षिक रु. २४
विद्यार्थी, अध्यापक, प्राध्यापक, शैक्षणिक संस्था व
वाचनालये यांना १० टक्के सूट.

कार्यालय : ३८ युसुफ बिल्डिंग, ४ था मजला,
वीर नरीमन रोड, मुंबई–४०० ०२३

सढळ अटींवर ठिकठिकाणी एजंट नेमणे आहेत.

davp 77/543

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक एकेचाळीस

११ मार्च १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

◻

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

**पुणे ४११ ०३०**

◻

दूरध्वनी : ४४३४५९

◻


# अवती - भवती

शरद कृष्णन्

## ◻ आणि आता महाराष्ट्रही....

महाराष्ट्र विधानसभेचे चित्र स्पष्ट करणारी अखेरची आकडेवारी डोळ्यांसमोर आली. अधिकृत काँग्रेस ६९, इंदिरा काँग्रेस ६२ हे आकडे वाचल्यावरच मनात शंकेची पाल चुकचुकली की वेळ आलीच तर कालपरवापर्यंत एक असलेल्या या काँग्रेसवाल्यांचे सत्तेच्या लोभाने एकीकरण होणार ! इतर आकडेवारीही अशा एकीकरणाला खतपाणी घालणारी होती. जनता ९९, मार्क्सवादी कम्युनिस्ट ९, शेकाप १३, सारे एकत्र आले तरी सत्तेची खुर्ची हाती लागणे कठीणच दिसत होते; परंतु जनतावालेही चिकट. महाराष्ट्रात आपलीच सत्ता आली पाहिजे म्हणून एस्. एम्. पन्नालाल कामाला लागले. दिल्लीहून नानाजी आले. मधुजीही आले. नेतृत्वाचा प्रश्न निकाली निघाला, नानाजींच्या मुंबईफेरीचे चीज झाले... जनता पक्षाचे विधानसभेमधील नेते म्हणून उत्तमराव पाटील यांची निवड झाली आणि जनता पक्षाचे सारे प्रमुख नेते आपल्या मित्रांच्या शोधात बाहेर पडले. इकडे काँग्रेसवालेही एकत्र आले आणि मिळतील तेवढे दोस्त बकोटीला मारून राजभवनावर रवाना झाले. सभागृहाचे एकूण सदस्य २८८. परंतु जनता पक्ष आणि काँग्रेस यांचे आपल्याला असलेल्या पाठिंब्याचे दावे खरे मानले तर हा आकडा तीनशेच्या घरात जात होता. दोन्ही याद्यांच्या छाननीचे काम सुरू होताच आपल्याला पाठिंबा देणाऱ्या तमाम आमदारांना त्यांनी एकत्र केले. राहण्या-खाण्याची व्यवस्था तर केलीच; पण आपल्यावरील लोभ आटू नये याची दक्षता घेऊन वर प्रेमाच्या ' बंदोबस्ताचे ' खतपाणीही घातले. मुंबईचे आमचे राजभवन तसे निवांत...पण गेल्या पाच-सात दिवसांत राजभवनवर एकच गडबड उडाली. केवळ याद्या देऊन भागण्यासारखे नाही हे चतुर काँग्रेसवाल्यांनी ओळखले आणि वसंतदादा १४९ आमदारांचा फौजफाटा घेऊन राजभवनावर हजर झाले. बहुमताचा एवढा बिनतोड पुरावा सादर करूनही राज्यपाल निर्णय देईनात. वातावरण तापू लागले... सोमवार दि. ६ मार्च रोजी दिल्लीतही त्याचे पडसाद उमटले. संसदेमध्ये राज्यपाल पक्षपात करीत आहेत असा आरोप काँग्रेसवाल्यांनी करून सभात्याग केला. लोकांमध्येही काय होणार याबाबतची उत्सुकता वाढत होती. रविवारी हजेरीचा कार्यक्रम झाल्यावरही मुख्यमंत्री ठरेना. काळ-काम-वेगाचे गणित संभाळत अंकाला ताजा मजकूर देणे कठिण दिसू लागले. सोमवारी संध्याकाळी खरी धावपळ सुरू झाली. जनता पक्ष आणि काँग्रेस दोन्ही बाजू आपल्या जागी घट्ट उभ्या होत्या. राज्यपाल अजून निर्णय देत नाहीत म्हणून पंतप्रधान-राष्ट्रपती यांच्याशीही संपर्क

साधला गेला. दडपण वाढू लागले. वादग्रस्त प्रश्न म्हटला की, छागलासाहेब लगेच मतप्रदर्शन करतात. भारताचे परराष्ट्रमंत्रीपद भूषवणाऱ्या छागलांनी राज्यपालांना *सल्ला* देणारे पत्रक प्रसिद्ध केले. निवडणूक–निकालाच्या वेळची परिस्थिती लक्षात घेऊन जनता पक्षाला सरकार बनविण्याची संधी द्यावी असा सल्ला दिला. शांती पटेल, मृणाल गोरे, विरेन पटेल राज्यपालांना भेटून आले. सोमवार ६ मार्च संध्याकाळची ही गोष्ट. वातावरण कडकडून तापविण्याचे कसून प्रयत्न चालूच होते. चौपाटीवर जनता पक्षाची सभा चालू असतानाच वसंतदादांना बोलावणे आले. दादांबरोबर मधुकरराव चौधरी, यशवंतराव मोहिते, शरद पवार ही बदललेल्या परिस्थितीत महत्त्वपूर्ण ठरणारी सर्व मंडळी हजर होती. इंदिरा कॉंग्रेसचे नाशिकराव तिरपुडे, रामराव आदिक, बाबुराव काळे हजर होते. उगाच शंकेला वाव राहू नये म्हणून अर्धे मंत्रिमंडळ दादांच्या मागे धावत होते म्हणा ना. राज्यपालांकडून मंत्रिमंडळ बनविण्याबाबतचे पत्र घेऊनच मंडळी बाहेर पडली. गेल्या चार–पाच दिवसांत घेतलेल्या कष्टाचे, केलेल्या खर्चाचे चीज झाले होते. मोठ्या खुषीत दादांनी राज्यपालांचे पत्रच प्रसिद्धीसाठी दिले आणि मंगळवारच्या साऱ्या वृत्तपत्रांत आठ कलमी मथळ्याला वाट मिळाली. आंध्र–कर्नाटक स्वतःच्या ताकदीवर जिंकणाऱ्या इंदिराजींनी आता अर्धा महाराष्ट्रही सर केला. काल–परवापर्यंत नगण्य वाटणारे तिरपुडे निवडणूकनिकालानंतर महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या इंदिरा गटाचे नेते झाले आणि त्याच अधिकारातून आता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीही झाले आहेत. नेतेपदाच्या फाळणीवर हे प्रकरण थांबणारे नाही. खातेवाटपही फाळणीपद्धतीने होणार आहे. गृहखाते दादांच्या माणसाला मिळाले तर अर्थखात्यावर इंदिरा कॉंग्रेसचा दावा आलाच. खात्याचा प्रमुख मंत्री इंदिरा कॉंग्रेसचा असला तर राज्यमंत्री किंवा उपमंत्री इंदिरा कॉंग्रेसचा आलाच. अविश्वास आणि अंतर्गत तणाव यांची ही अशी गडद छाया दादांच्या नव्या मंत्रिमंडळावर पडणार आहे. लोकसभा निवडणूक–निकालानंतर दादांवर मंत्रिमंडळ बनवण्याची पाळी आली, त्या वेळी पक्ष एकसंध असताना, पाठीशी प्रचंड बहुमत असतानाही– असंतुष्टांना संतुष्ट करण्यासाठी मंत्रिमंडळाचा पसारा ऐसपैस पसरावा लागला. मजबूत पाया उभारून मंत्रिमंडळाचा ऐसपैस इमला उभा करण्यात आला. आता तर काय एकमेकांना पाण्यात पहाणारी मंडळी सत्तेसाठी एकत्र आली आहेत. महिन्या–पंधरा दिवसांपूर्वीच निवडणूकसभातून त्यांनी एकमेकांविरुद्ध जी आग ओकली त्याचे जळजळीत अंगार वृत्तपत्रांतून फुलून आले आहेत. आता त्यांची राख झाली असे केवळ आपणच नाही तर ही आग प्रत्यक्ष ओकणाऱ्या त्या मंडळींनीही समजायचे आणि एकत्र येऊन सत्ता वाटून घ्यायची. मीच निवडणुकीनंतर मुख्यमंत्री होणार अशी घोषणा करणारे दादा पुन्हा मुख्यमंत्री झाले आहेत खरे; पण सचिवालयामधील त्यांच्या कचेरीला छेद गेला आहे. त्यांच्या अर्ध्या कचेरीवर आता नाशिकरावांचा दावा आहे. त्यात पुन्हा बहुमत इतके पुसटते आहे की, जरा इकडे–तिकडे झाले तर आधीच पार्टिशन पडलेली ही अर्धी कचेरीही सोडावी लागणार आहे. सत्तेच्या वाटपासाठी मंडळी एकत्र आलेली असली तरी परस्परांबद्दल वाटणारा द्वेष, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा यात जरा म्हणता जरा काही कमी नाही. आपल्यामागे बहुमत आहे असा दावा करीत दादा इंदिरावाद्यांना संगती घेऊन आले खरे; पण इंदिरावादी दादांच्या गटापासून वेगळेच बसले. दादांचा मनुष्य राज्यपालांसमोर हजेरी देण्यासाठी उठला तर दादांचा गट टाळ्या देई. इंदिरावादी स्वस्थ बसत. इंदिरा कॉंग्रेसवाल्यांनाही दादांनी नेमके असेच वागवले. दादांचे ठीक आहे. ते सत्तेवर येण्याची शक्यता दिसत होती; पण मंत्रिपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडून इंदिराजींच्या चरणी सर्व निष्ठा वाहणाऱ्या नाशिकरावांना मानावेच लागेल. राजकारणामध्ये धोका जेवढा मोठा तेवढेच पारितोषिक मोठे किंवा शिक्षाही तेवढीच जबर असते. इंदिरा कॉंग्रेसला विदर्भामध्ये मिळालेला धक्कादायक पाठिंबा लक्षात घेतला तर *नाशिकरावांच्या राजकीय हुशारीला मानावेच लागेल.* हयातभर राजकारण करून दहा वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या नाइकांना विदर्भामधील इंदिरा वाऱ्याची झुळूक समजू शकली नाही. त्यांच्या अर्ध्या सभा त्यांनी पराभूत इंदिराजींवर टीकाटिप्पणी करण्यात खर्ची घातल्या आणि निकालानंतर दाती तृण धरून बाईंचे पाय धरले ! अर्थात प्रथमपासूनच पायाशी बसून असलेल्या नाशिकरावांना आता मानावेच लागेल. यशवंतराव मोहिते, शरद पवार, मधुकरराव चौधरी, सगळ्यांच्या डोक्यावर हात फिरवून आपल्या *ताकदीच्या जोरावर त्यांनी दादांची अर्धी कचेरी बळकावून* घेतली आहे. टेकू घेत घेत कसेबसे सत्तेवर आलेले हे दादांचे मंत्रिमंडळ महाराष्ट्रात सत्ताग्रहण करीत आहे आणि त्यातही सत्तेचा निम्मानिम वाटा इंदिरेने पुरेपूर वसूल केला असताना यशवंतरावांना आनंद व्हावा असे यात काय आहे ? पण विचारणाराने त्यांना प्रतिक्रिया विचारली– आणि त्यांनीही सांगितले, मला खूप खूप आनंद झाला ! आनंद खरोखरीच झाला असेल तर होवो बापडा; पण त्यांच्या आनंदाच्या संवेदना आता महाराष्ट्रात उमटत नाहीत हे त्यांनी लक्षात घेण्याची वेळ जरूर आली आहे. हां, आता महाराष्ट्रात *कॉंग्रेस शासन* सत्तेवर आल्याने लोकसभेमधील कॉंग्रेस पक्षीय सदस्यांचा इंदिरेकडे जाण्याचा वेग मंदावण्याची शक्यता वाटून साहेबांना आनंद वाटत असेल तर भाग वेगळा. अर्थात हा आनंदसोहळा केवळ साहेबांनीच साजरा केला असे नाही, तर भुसभुशीत पायावर उभ्या असलेल्या या खुर्चीचे स्वागत पुण्या-मुंबईत सपाटून मार खाऊनही कॉंग्रेसवाल्यांनी फटाके वाजवून केलेच की ! !

राज्यपालांना निर्णय अधिक काळ लांबवणे शक्य नव्हते. दोन्ही याद्या तपासून झाल्या होत्या. जनताने ओढून-ताणून जमवलेल्या १४५ पेक्षा त्यांना प्रत्यक्ष हजर राहून पाठिंब्याची ग्वाही देणारे १४९ जास्त महत्त्वाचे वाटले तर ते समजण्यासारखे आहे. कोणत्याही पक्षाला स्थिर शासन देणे अवघड आहे. अशा परिस्थितीमध्ये सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष म्हणून जनता पक्षाला संधी मिळाली असती तर ते जास्त वाजवी ठरले असते आणि केवळ राज्यपालांच्या सदसद्विवेकबुद्धीवर अवलंबून न राहता एक चांगला संकेतही पाडला गेला असता. खऱ्या बहुमताची कसोटी अर्थात विधानसभेमध्येच *लागली असती.* राज्यपालांनी *निर्णय* घेताना स्थिर सरकार कोण देऊ शकेल याच्यापेक्षा जास्त स्थिर सरकार जास्त काळ कोण देऊ शकेल याचा विचार करून निर्णय घेतलेला दिसतो. राज्यपालांविरुद्ध भुई बडवणाऱ्या आणि दिल्लीमधील जनता-शासनावर आरोप

करणाऱ्या काँग्रेसवाल्यांचा आवाज राज्यपालांच्या निर्णयाने आपो-आपच बंद झाला आहे. राज्यपालांच्या या निर्णयाने दिल्लीतील जनता-सरकारची प्रतिमा आपोआपच थोडीशी उजळणार आहे. निदान जनता-सरकार राज्यपालांवर दडपण आणत नाही, याची पोच राज्यपालांच्या निर्णयाने आली आहे. आज इंदिराजी केंद्रस्थानी असत्या आणि आज जनता पक्षाच्या जागी त्यांचा पक्ष असता तर त्यांनी सर्व उपाय वापरून आणि राज्यपालांवर दडपण आणून आपल्या पक्षाचे सरकार आणले असते. जनता-सरकारने तसे काही केलेले नाही.

जनता-सरकारने जरी काही केले नसले तरी जनता पक्षाला मात्र राज्यपालांचा हा निर्णय मानवणार नाही. नवीन मंत्रिमंडळ पराभूत करण्यासाठी जनता पक्षाला आणि त्यांच्या मित्रमंडळींना आता विधानसभेत प्रयत्न करावे लागतील. सत्तेची खिरापत वाटून कुंपणा-वरील मुंगळ्यांना आवाक्यात ठेवणे शक्य असल्याने सारे काँग्रेसवाले एक होऊन सत्ता राबविण्याचा नव्हे तर यशवंतरावांच्या निवडणूक-काळातील शब्दांत सांगायचे तर सत्ता उपभोगण्याचा आणि राजाची ऐट मिरवण्याचा कसून प्रयत्न करतील.

निवडणुकीच्या महाभारतामध्ये जनता पक्षाची पूर्ण सरशी झाली नाही तरी सर्वाधिक जागा जिंकून त्यांनी अग्रक्रम मिळवला. जनता पक्षाची विजयी वाटचाल स्वतःच्या ताकदीवर रोखणे अशक्य आहे हे लक्षात आल्यावर सारे काँग्रेसवाले एक झाले. इतस्ततः विखुरलेले अपक्ष त्यांनी गोळा केले आणि सरकार बनविण्याची दुसरी फेरी त्यांनी जिंकली. या युद्धाचे अखेरचे पर्व आता विधानसभेमध्ये खेळले जाणार आहे. दोन्ही बाजू शर्थीने लढल्या तरी पाच वर्षांचा काळ म्हणजे बरीक फारच आहे. त्यामुळे एकमेकांवर मात करण्याच्या या अखेरच्या फेरीतच अस्थिरतेचे भवितव्य वाढून ठेवले आहे. ☐

## ☐ आंध्र आणि कर्नाटक

आंध्र आणि कर्नाटकमध्ये इंदिरा काँग्रेसने सत्ताग्रहण केले आहे. बाईंच्या नेतृत्वाखाली शोभून दिसतील अशा सुभेदारांनी या राज्यांची सूत्रे हाती घेतली आहेत. ज्या राज्यपालांनी केवळ दोन महिन्यांपूर्वीच देवराज अरस यांची हकालपट्टी केली होती त्याच राज्यपालांना लोकेच्छा प्रमाण मानून देवराजजींना सरकार बनवि-ण्याचे आमंत्रण द्यावे लागले. बो. बसवलिंगप्पा यांनी नेतृत्वाची निवडणूक आपण लढवणार अशी घोषणा केली असली तरी दिल्ली-हून बाईंचा संदेश घेऊन आलेल्या मीर कासिम यांनी बाईंची इच्छा काय आहे हे स्पष्ट केल्यावर, बसवलिंगप्पा यांनीच देवराजजींचे नाव सुचविले. भास्कर नायडू यांनी अनुमोदन भरले आणि देवराजजींची पुढील पाच वर्षांची वाट मोकळी झाली. २२४ सदस्य असलेल्या कर्नाटक विधानसभेमधील १५० इंदिरावाद्यांचे नेतृत्व त्यांच्याकडे गेले आणि राजभवनातून आमंत्रण सुटले. शपथविधीसमारंभ ताणा-ताणीतच झाला. स्वतः देवराजजी अतिशय ताठरपणे वागले. त्यांच्या वर्तनामध्ये समारंभी सौजन्याचाही अभाव दिसला, तर त्यांच्या अनुयायांनी राज्यपालविरोधी घोषणांनी वातावरण सतत तप्त ठेवले. देवराजजी पुन्हा मुख्यमंत्रीपदी आरूढ झाल्याने ग्रोव्हर आयोगाचे पुढील कामकाज आता कसे चालते आणि आयोगाच्या अहवालातून अखेरीस काय निष्पन्न होते ते पहायचे. अरस यांना यासंबंधी प्रश्न विचारण्यात आले तर त्यांनी साऱ्याच गोष्टी हसण्या-वारी नेल्या. केंद्राशी संघर्ष नको अशी आपली भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले असले तरी राज्यांना अधिक अधिकार मिळाले पाहिजेत असे त्यांनी आग्रहाने सांगितले आहे. हे अधिकार काही आम्हाला मौजमजा करण्यासाठी नको आहेत तर जनहिताच्या योजना राबविण्यासाठी हवे आहेत; असे अधिकार मिळाले तरच आमच्या कामाचा वेग चांगला राहील हे केंद्राने लक्षात घ्यावे, असेही त्यांचे सांगणे आहे. राज्यामध्ये विरोधी पक्षाचे सरकार असले तरी काहीही बिघडत नाही असे सांगून ते म्हणाले, 'काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत एकाच पक्षाचे राज्य असले पाहिजे असे तर काही घटनेत सांगितलेले नाही ना? राज्यामध्ये विरोधी पक्षाचे सरकार असण्याची परिस्थिती काही प्रथमच उद्भवत नाही. तेव्हा उगाच त्याचा बागुलबुवा करण्याचे कारण नाही.' राज्यपाल घटनेपेक्षाही केंद्र सरकारचे वफादार नोकर असल्यासारखे वागतात, असे जे विधान त्यांनी केले होते त्याबाबत बोलताना ते म्हणाले, 'आपण केंद्र सरकारपेक्षा घटनेला जास्त जबाबदार आहोत हे राज्यपालांनी लक्षात घेतलेच पाहिजे!' देवराज अरस यांनी विधानसभेमध्ये आपल्या पक्षाचे नेतृत्व स्वीकारले असले तरी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून सध्या तेच काम पहात आहेत. पूर्ण विश्वासाचा मनुष्य गवसला म्हणजे अर्थातच प्रदेशाध्यक्षाची जबाबदारी देवराजजी त्यांच्यामार्फत पार पाडतील.

कर्नाटक आणि आंध्रमध्ये इंदिरा काँग्रेसला जे प्रचंड यश मिळाले त्याचे अर्थ आता लावण्यात येत आहेत. बाईंसंबंधी कसा प्रचंड भक्तिभाव दलितांमध्ये आहे याचा तपशील आता बाहेर येत आहे. देवराज अरस यांनी अनेक भानगडी केल्या तरी जनहिताच्या—विशेषतः दलितांच्या हिताच्या— अनेक चांगल्या योजना राबविल्या असे आता नमूद केले जात आहे. या प्रचंड विजयाचे पडसाद दिल्ली-मध्ये उमटणे स्वाभाविक होते. ज्या दिवशी हे निकाल दिल्लीमध्ये येऊन थडकले त्याच दिवशी शहा आयोगाशी असहकार पुकारल्या-बद्दल इंदिराजींना न्यायालयासमोर हजर रहावे लागणार होते. बाई, संजय, राजीव आदी सारी मंडळी न्यायालयात हजर होती. स्वतः इंदिराजी प्रसन्न होत्याच; पण त्यांचे सारे सहकारीही एकदम खूष होते. बाईंच्या जयजयकाराचे पडसाद न्यायालयामध्ये घुमत होते. त्यांच्या वकिलांनीही कर्नाटक निकालाचा संदर्भ देऊन, 'सरकारी वकिलांना त्यांनी आजचे वर्तमानपत्र वाचले आहे काय?' असा प्रश्न केला. थोडक्यात म्हणजे कर्नाटकची इंदिरा-हवा थेट दिल्लीत येऊन पोचली. न्यायालयाचे कामकाज आटपून आल्यावर बाई महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गुंतल्या होत्या. ते त्यांच्या पद्धतीने मार्गी लावल्या-वर बाईंनी जंगी पत्रकारपरिषद बोलावली. तमाम पत्रकारांना आमंत्रणे गेली होती. या पत्रकारपरिषदेमध्ये बाईंनी प्रथमच सांगि-तले, रेड्डी-चव्हाण काँग्रेस हीच सध्या आपली नंबर एकची शत्रू. जनता पक्ष त्यानंतर. महाराष्ट्रातल्या जांबुवंतराव धोटे यांच्यापासून ज्या कोणाचा मिळेल त्यांचा पाठिंबा घेऊन हे रेड्डी-चव्हाण-प्रकरण संपवायचे. आपली काँग्रेस म्हणजेच खरी काँग्रेस हे एकदा निर्विवाद-पणे प्रस्थापित करायचे आणि मग जनताचा समाचार घ्यायचा असा त्यांचा कार्यक्रम दिसतो. लोकसभा निवडणुकांमधील दारुण पराभवा-

पृष्ठ २१ वर

# चक्रम्चक्री ( ३० )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# मतपेटीतील क्रांतीच्या मर्यादा

विश्वनाथ, निवडणुकीच्या धुमाकुळात अगदी गप्प होता तुम्ही? 'माणूस'च्या संपादकांनी विशेषांकांमागून विशेषांक काढले; पण तुमची हजेरी काही दिसली नाही!

गेल्या निवडणुकांइतक्या रटाळ आणि कंटाळवाण्या निवडणुका माझ्या आठवणीत तरी दुसऱ्या झाल्या नाहीत. कोणतेही विवक्षित प्रश्न असे आपल्यापुढे नव्हतेच. बरं, आपल्या शहरी भागापुरतं म्हणाल तर जनतापार्टी निवडून येणार हे सगळयांनाच माहीत होतं. मग निवडणुकीविषयी बोलण्याजोगं उरलंच काय?

तुम्ही म्हणता तसं थोडं झालं खरं. विधानसभांच्या निवडणुका या तशा दुय्यमच महत्त्वाच्या असतात, चुरस आढळते ती केवळ उमेदवारांच्या प्रयत्नामुळे. वास्तविक, राज्यांच्या हवाली तुमच्या-आमच्या जिव्हाळयाच्या बाबी असताना या निवडणुकांना अशी अवकळा का यावी?

कारण कागदोपत्री राज्यांना अनेक बाबतीत स्वतंत्र कायदे करण्याचा अधिकार असला तरी गेल्या वीस वर्षांत प्रत्यक्षात राज्यसरकारे ही केंद्रसरकारच्या प्रांतिक कचेऱ्या असल्यासारखीच वागत आलीत. शेती, शिक्षण, स्थानिक स्वराज्य ही परवापर्यंत पूर्णपणे राज्यसरकारांच्या अखत्यारात असलेली खाती होती; पण यापैकी कोणत्या बाबतीत कोण्या राज्यसरकारनं आपलं वैशिष्टय दाखवलंय? सर्व धोरणं अखिल भारतीय स्तरावर ठरली आणि ती ज्या त्या राज्यसरकाराने आपापल्या मगदुराप्रमाणे राबविली. इंदिराबाईंच्या काळात तर या सर्व गोष्टींचा किळसवाणा अतिरेक झाला. राज्यांचं आणि विधानसभांच्या निवडणुकांचं महत्त्व कमी करण्याचं अपश्रेय बाईंच्या पदरात बांधलं पाहिजे!

घसरलात बाईंवर! अहो, जरा खुलासेवार बोला!

नीट समजावून सांगतो. जोपर्यंत राज्यांमध्ये खंबीर मुख्यमंत्री होते तोपर्यंत राज्यांच्या हवाली असलेल्या क्षेत्रात काही प्रयोग होत होते. जुन्या मुंबई राज्यात दारूबंदी, इंग्रजीचं महत्त्व कमी करणे, शैक्षणिक वर्ष बदलणे, भाडे-नियंत्रण कायदा, कूळकायदा अशी काही वैशिष्टयपूर्ण आणि स्वतंत्र धोरणे ठरवली गेली आणि अंमलातही आणली; पण सत्तर सालापासून रोजगार हमी योजनेखेरीज दुसरं कोणतं स्वतंत्र धोरण महाराष्ट्र सरकारनं आखलंय् सांगा बघू? राजाजी, मुरारजीभाई, गोविंदवल्लभ पंत अशी पंतप्रधानांच्या तोडीची माणसं मुख्यमंत्री म्हणून वावरत होती तोपर्यंत राज्यांची स्वतंत्र धोरणे होती. इतकेच नव्हे तर अखिल भारतीय धोरणे बदलून घेण्याची हिम्मतही राज्यसरकारे दाखवीत होती; पण अशी माणसं राज्यपातळीवरून नाहीशी झाली आणि नव्या उमेदीची नि स्वतंत्र वृत्तीची माणसं अधिकारावर राहूच द्यायची नाहीत असे धोरण असणाऱ्या बाईंची राजवट सुरू झाली. त्या राजवटीत काय झाले ते आपण पहातोच आहोत. स्वतंत्र धोरणे राहूच द्यात; पण सरकारी शाळांत अमुक मास्तरीण नोकरीला ठेवायची की नाही हें सुद्धा पंतप्रधान सांगू लागल्या!

छा:, असलं एखाद-दुसरं अपवादात्मक उदाहरण नको. मला सांगा की, कापूस एकाधिकार खरेदी, ज्वारीला ठरीव कमीत कमी किंमत ही धोरणं महाराष्ट्र सरकारनं आखलीच की नाही? शेतीवरील मिळकतकराला विरोध केलाच होता ना? इतर राज्यांत काय असेल ते असो; पण महाराष्ट्रात काही स्वतंत्र धोरण सरकारला होतं हे तुम्ही मानलंच पाहिजे!

अहो, तुम्ही दिलेली उदाहरणं ही किरकोळ आहेत. बरं, त्या धोरणांना बाईंच्या सरकारचा विरोध होता, असंही नाही. उलट, केंद्रीय नोकरांच्या महागाईभत्त्याचा प्रश्न घ्या. राज्यसरकारचं असं मत होतं ना, की केंद्रीय महागाईभत्ता आपण आपल्या नोकरांना देऊ शकणार नाही नि तो न देणं हे अन्यायाचं आहे, म्हणून? मग जेव्हा जेव्हा केंद्रानं महागाईभत्ता वाढविला तेव्हा तेव्हा राज्यसरकारांनी त्याला विरोध का नाही केला? बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने शेती आणि शिक्षण ही क्षेत्रं सामायिक यादीत घातली तेव्हा कोण्या राज्यसरकारची त्याला विरोध करण्याची छाती झाली? नानी पालखीवाला नेहमी सांगत असतात की, अशा अनेक जिनसांवर मध्यवर्ती सरकारने बेकायदा कर बसवलेत की ज्यांच्यावर कर बसविण्याचा अधिकार केवळ राज्यसरकारचा होता, केलीय् कधी राज्यसरकारांनी तक्रार? आपण आता इंग्रजी राजवटीतले 'प्रांत' राहिलो नसून 'राज्य' झालो आहोत याची उमजच राज्यांना झालेली नाही, असं म्हणावं लागतं. तेव्हा अशा स्थितीत विधानसभांच्या निवडणुकांची पातळी पिंपळगाव–बसवंतच्या विंच–खरेदी–विक्री–संघाच्या कार्यकारिणीच्या निवडणुकांच्या पातळीपेक्षा अधिक वरची असणार कशी?

### निवडणुकांचे निकाल

ते एक असो. निवडणुका काही विशेष इंटरेस्ट घेण्यासारख्या तुम्हाला वाटल्या नाहीत, हे समजले; पण निवडणुकांचे निकाल तरी चर्चेचे मोहोळ उठविण्याइतके धक्कादायक आहेत की नाहीत? आहे की नाही हिंमतीची आणि कर्तृत्वाची बाई? दोन राज्यं आली तिच्या पंखाखाली!

निवडणुकांत बाईंनी जो झपाटा दाखवला तो आमच्यासारख्या, त्यांची कोणतीही गोष्ट तिरस्काराची वाटणाऱ्या, लोकांनासुद्धा कौतुकास्पद वाटावा असा होता, यात शंका नाही; पण यात नवीन असं काय होतं?

बाई जिद्दीच्या, तडफदार आणि नाटचपूर्ण हालचाली करण्यात नेहमीच चतुराई दाखवीत आल्या आहेत. बेलछीला हरिजनांवर अत्याचार झाले तेव्हा इतर कोणत्याही मातब्बर पुढाऱ्याच्या आधी बाई तेथे पोचल्या! आंध्रात वादळ झाले, मुख्यमंत्र्याच्या आधी बाई जाऊन हजर! या निवडणुकीत देखील रात्रंदिवस फिरून, खेड्याखेड्यांतून सभा घेऊन आणि क्वचित घरोघरी जाऊन बाईंनी प्रचार केला. याचे कौतुक लोकांना वाटले आणि अनेक भोळसट लोकांनी त्यामुळे मते दिलीही असतील; पण बाईंच्या या परिश्रमाचे आणि धडपडीचे कौतुक झाल्यावर काय उरते?

मुद्दा लक्षात नाही आला माझ्या!

मला असं म्हणायचं आहे की, बाईंच्या पक्षाचा हा विजय बाईंच्या धडपडीमुळे झाला हे म्हणणं कितपत खरं आहे? तो विजय कितपत टिकाऊ आहे? आंध्रातील विजय हा चेन्ना रेड्डींमुळं झालेला आहे. चेन्ना रेड्डी हे काय प्रकारचे उपद्व्यापी आणि उच्छृंखल गृहस्थ आहेत याची चुणुक तेलंगण आंदोलनात आपल्याला आलेली आहे. निवडणुकीत गैरप्रकार केल्याने यांची खासदारकी व मंत्रिपद गेले. त्यामुळे रागावून त्यांनी तेलंगणाचं आंदोलन दोन वर्षं चालवलं आणि धुमाकूळ घातला. शेवटी राज्यपालपद देऊन त्यांची समजूत इंदिराबाईंनी काढली. कर्नाटकातला विजय हा अरसांमुळे मिळाला. अरस हेही महाउपद्व्यापी आणि कारस्थानी गृहस्थ आहेत! महाराष्ट्राविषयी म्हणाल तर इथला विजय बाईंचा नसून असंतुष्ट काँग्रेसजनांचा विजय आहे, असं म्हणावं लागतं. याउलट जनता पक्षाचा विजय माझ्या दृष्टीने अधिक आशादायक आहे.

## भविष्याची चाहूल

ही तुमची अगदीच उफराटी विचारसरणी झाली. अहो, तुम्ही-आम्ही असं मानत आलो की, बाई म्हणजे भारतीय राजकारणाला जडलेला कॅन्सर किंवा महारोग आहे! हे राजकारण नेस्तनाबूद झालं पाहिजे! बाईंची पाळंमुळं उखडली गेली पाहिजेत. अशा स्थितीत दोन राज्यांत बाईंच्या नावाचं कुंकू अभिमानानं कपाळावर मिरवणारी माणसं अधिकारावर आली याचं तुम्हाला काहीच वाटत नाही? आणि जनता पक्षानं काही फुटकळ जागा जिंकल्याचं मात्र कौतुक वाटतं, हे विपरीत नाही का? लोकसभेच्या निवडणुकांत बाई आणि त्यांचा बाब्या पडल्यावर आपल्यापैकी कित्येकजण 'नेहरूंचा राजवंश बेचिराख झाला!' असा बुभुःकार करीत होते त्याचं काय झालं? पुनः बाईंची मध्यरात्रीची खलबतं चालू आहेत, मान्यवर नेत्यांना चपराशाप्रमाणे वागवणं, त्यांची अवहेलना करणं, खोटं बोलणं, आक्रस्ताळेपणा हे 'गुणविशेष'ही पुन्हा दिसून येत आहेत आणि तरीही तुम्हाला जनता पार्टीची किरकोळ प्रगती आशादायक वाटते?

हां, हां, हा तुमचा झपाटा आधी थांबवा बघू. बाई या भारतीय राजकारणातला सडका भाग आहे, असं मी ६९ सालापासूनच मानत आलो; पण गेल्या लोकसभेच्या निवडणुकांत 'नेहरूंचा राजवंश बेचिराख झाला!' असं म्हणणाऱ्यांपैकी मात्र मी नव्हतो. मतपेटीतून येणाऱ्या क्रांतीची ही मर्यादा आहे की, तीत आधीचं राजकारण मरून जात नसतं. जर काही कट-कारस्थानं होऊन किंवा राजकीय भूकंप होऊन बाईंची आणीबाणी उलथून पडली असती, तर बाईंचा कायमचा बंदोबस्त करणं नव्या राजवटीला शक्य झालं असतं; पण नव्या राजवटीची वैधानिकताच बाईंनी घेतलेल्या निवडणुकांमुळे प्राप्त झालेली असल्यानं जनता सरकारला बाईंचं राजकारण पोलिसी उपायानं थांबवणं अशक्य आहे. याच कारणानं नव्या सरकारला बाईंनी सुप्रीम कोर्टावर नेमलेले न्यायाधीशही बदलता आले नाहीत. बाईंचा सामना मतपेटीच्या द्वारेच केला गेला पाहिजे. त्याला जोड देण्याचा प्रयत्न शहा-कमिशन, ग्रोव्हर-कमिशन यांच्या द्वारे जनता पक्षाने केला; पण तो पुरेसा परिणामकारक होऊ शकणार नाही. मला तर असं वाटतं की, बाई शहा-कमिशनविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम लवकरच सुरू करतील. मग परिस्थिती फारच अडचणींची निर्माण होईल.

असं असूनही तुम्हाला भविष्याविषयी आशा का वाटते?

तुम्ही असं पहा की, ज्या प्रांतात निवडणुका झाल्या तेथे जनता पक्षाची स्थिती काय होती? कर्नाटकात जनता पक्षाने लोकसभेच्या फक्त दोन जागा जिंकल्या होत्या आणि आंध्रात एक. अजूनपर्यंत जनता पक्षाची संघटना उभी राहिली नाही. लोकांच्या हृदयाला भिडेल अशी कोणतीही नाटचपूर्ण कृती जनता पक्ष करू शकलेला नाही. ती त्या पक्षाची वृत्तीही नाही. असूनही नये. असं असूनही शहर-भागातील जागृत जनतेने एकमताने या पक्षाला निवडून दिलं आहे. मुंबईत विधानसभेच्या सगळ्या जागा एका पक्षाने जिंकल्या अशी गोष्ट कधी घडली नव्हती! तरी हे का झाले? अनेक भांडणं झाली असता पक्षांतर्गत मतभेद असताना अतिशय स्वच्छ प्रचार-मोहीम आखून आणि कुणावरही दडदण न आणता पैसे गोळा करून जनता पक्षाने निवडणूक लढविली हे ध्यानात घ्या! याचा अर्थ शहरी माणसाला हा पक्ष आपला वाटतो हे उघड आहे. ही जनता पक्षाची खरी ताकद आहे!

जोपर्यंत जनता पक्षाची संघटना उभी रहात नाही तोपर्यंत लाटांचे आणि वादळांचे राजकारण चालत राहील. अशा राजकारणासाठी बाई या सर्वांत लायक पुढारी आहेत; पण जनता पक्षाची तालुकावार संघटना उभी राहिली, तेथील पदाधिकारी रीतसर निवडून आले, तालुका पक्षाला उमेदवार ठरविण्याचे स्वातंत्र्य राहिले की लाटांचे राजकारण नाहीसे होईल. बाईंचे खरे सामर्थ्य कोणाचीही मध्यस्थी न वापरता अशिक्षित जनतेपर्यंत पोचता येणे हे आहे. बाई आणि जनता यांच्या दरम्यान जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या फळ्या उभ्या राहिल्या की हें सामर्थ्य उरणार नाही! म्हणूनच मला बाईंच्या विजयापेक्षा जनता पक्षाची प्रगती अधिक आशादायक वाटते.

# मतदारसंघटना

## एका कल्पनेची रूपरेखा

वा. दा. रानडे

निवडणुका संपल्या, नवी मंत्रिमंडळेही अधिकारावर आली. इंदिरा काँग्रेसला मिळालेल्या यशाबद्दल राजकीय निरीक्षकांनी आश्चर्य व्यक्त केले. ही तर अगदी प्राथमिक प्रतिक्रिया झाली. आपण तेथेच थांबणार की, अधिक काही करणार आहोत ?

आणीबाणीच्या काळचा कालखंडातून गेल्यानंतर वर्षभरातच इंदिरा गांधींना एवढे यश कसे मिळते याचा सखोल अभ्यास करायला हवा, अंतर्मुख होऊन कठोर आत्मपरीक्षण करायला हवे आणि आपल्या चुका दुरुस्त करायला हव्यात. १९७१–७२ च्या निवडणुकांत इंदिरा गांधींना भरघोस यश देणाऱ्या मतदारांनीच १९७७ च्या निवडणुकीत त्यांना व त्यांच्या पक्षाला सत्तेवरून खाली खेचले. मतदारही अनुभवातून शिकत असतात, आपल्या चुका दुरुस्त करीत असतात. काही वेळा त्यांना लौकर जाग येते, काही वेळा उशीरा येते एवढेच. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाहीला जीवननिष्ठा मानून प्राणपणाने तिची जपणूक केली पाहिजे. मतपेटी हे लोकशाहीचे एक प्रतीक आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात लोकशाही विचारप्रणाली व कार्यपद्धति निर्धारपूर्वक व निष्ठेने बाणवली पाहिजे. तिची मूल्ये रुजविली पाहिजेत. इंदिरा गांधींच्या हुकूमशाही कार्यपद्धतीचा एकदा अनुभव आला असताना आणि त्यांच्यात काहीही बदल झाला नसता भारतीय राजकारणात त्यांचा पुनः उदय होणे हा लोकशाहीस धोका आहे याची जाणीव मतदारांना व सर्वसामान्य जनतेस करून देणे आवश्यक आहे. ज्या मतदारसंघात त्यांच्या पक्षाचा विजय झाला तेथे अशा कार्याची विशेष आवश्यकता आहे. काँग्रेस राजवटीतील भ्रष्टाचार आणि अनागोंदीमुळे त्रासलेले जुन्या पिढीतील लोक म्हणत, 'यापेक्षा इंग्रजांचं राज्य बरं होतं.' आजही काही लोक म्हणत आहेत, 'यापेक्षा आणीबाणी बरी होती.' असे म्हणणारांची संख्या थोडी असली तरी वाढेल अशी परिस्थिती निर्माण होऊ द्यावयाची नाही असे आपण निर्धारपूर्वक ठरविले पाहिजे कारण अशा लोकांची संख्या वाढणे ही इंदिरा गांधींना सत्तेवर येण्याची संधी आहे. या लोकांचा आवाज आपणास इंदिरा गांधींप्रमाणे दडपशाही करून बंद पाडावयाचा नाही. तो समजून घेतला पाहिजे. प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, हे उद्‌गार रागाचे आहेत, वैतागाचे आहेत. हा वैताग कशामुळे निर्माण झाला आहे याची कारणे शोधून ती दूर करायला हवीत.

लोकशाही की हुकूमशाही यातून लोकशाहीची निवड आपण केली आहे. लोकशाहीचे काही अंगभूत गुण आहेत तसे दोषही आहेत. एका व्यक्तीच्या लहरीनुसार नव्हे तर बहुसंख्य लोकप्रतिनिधींच्या मतानुसार निर्णय हा लोकशाहीचा आत्मा. लोकमताला लोकशाहीत सर्वांत महत्त्वाचे स्थान. जसे लोक तशी लोकशाही त्या त्या देशाला मिळते. तेव्हा सर्वसामान्य लोकांची राजकीय जाण, समाजाबद्दलची कर्तव्यभावना वाढविण्याच्या कार्यावर अधिक भर राजकीय कार्यकर्त्यांनी द्यावयास हवा. लोकांनी इंदिरा गांधींच्या पक्षाला निवडणुकीत मोठे यश मिळवून दिले यावद्दल लोकांना म्हणजे मतदारांना दोष देता येणार नाही. मतदारजागृतीच्या कार्यात राजकीय कार्यकर्ते अपुरे पडले.

उमेदवारांना पाच वर्षांनी एकदा मतदारांची आठवण होते, एरवी ते मतदारसंघाकडे फिरकत नाहीत अशी मतदारांची तक्रार असते; पण आम्ही मतदारही पाच वर्षांनी एकदा मतपेटीत मत टाकण्यापलीकडे काय करतो हा प्रश्न स्वतःलाच विचारला पाहिजे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी, त्यातील दोष दूर होण्यासाठी सरकारी योजना, कारभार आणि निर्णयप्रक्रिया यात लोकांचा सहभाग वाढला पाहिजे. ज्या प्रतिनिधीला आपण निवडून दिले तो काय काय करतो, आपल्या भागातील प्रश्न, अन्याय विधानसभेत किंवा लोकसभेत कितपत मांडतो, तसेच ते सोडविण्यासाठी काय करतो ? मतदारसंघापुरतीच संकुचित दृष्टी न ठेवता आपले राज्य, आपला देश यासंबंधीच्या व्यापक प्रश्नावर तो काही भूमिका मांडतो का ? ज्या पक्षातर्फे तो उभा राहिला व निवडून आला त्याच्याशी तो कितपत एकनिष्ठ आहे ? पक्षाची शिस्त तो मानतो का ? एखाद्या प्रश्नावर पक्षाचे धोरण चुकीचे आहे असे त्याला वाटत असेल तर तो कसा वागतो ? पक्षावर उघड टीका करतो की; पक्षांतर्गत चर्चेत चुकीचे धोरण बदलून घेण्याचा आग्रह धरतो आणि बाहेर मात्र पक्षाच्या अधिकृत धोरणाविरुद्ध काही न बोलता त्याचे समर्थन करतो ? आपले धोरण ठरविताना आपल्या मतदाराचे मत जाणून घेण्याचा तो प्रयत्न करतो का ? आपल्या लोकप्रतिनिधीने आपले उत्पन्न जाहीर केले आहे का ? या सर्व बाबतीत मतदार जागरूक हवेत. लोकप्रतिनिधीच्या कार्यावर त्यांचे लक्ष हवे. तो आपल्या अपेक्षा पुऱ्या करीत नसेल, दिलेली आश्वासने पाळीत नसेल तर मतदारांनी त्याला जाब विचारला पाहिजे आणि तरीही त्याच्या कामात सुधारणा दिसली नाही तर त्याला परत बोलाविण्याची मागणी मतदारांनी केली पाहिजे. मात्र हे सारे कोणत्याही प्रकारची सक्ती किंवा दडपण यांचा अवलंब न करता लोकशाही मार्गाने झाले पाहिजे.

त्यासाठी मतदारांची संघटना उभारायला हवी. मतदानकेन्द्र हा प्राथमिक घटक धरून त्या पायावर ही संघटना उभारली जावी. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत प्रत्येक मतदारकेन्द्रात साधारणपणे ८०० ते १००० मतदार होते. प्रत्येक केन्द्रातील मतदारांची सभा घेऊन आठ–दहा जणांची समिती निवडावी. आपल्या भागातील मतदारांशी सतत संपर्क आणि निरनिराळ्या प्रश्नांवर त्यांचे मत, अडचणी, तक्रारी जाणून घेणे. तसेच प्रमुख राजकीय पक्षाच्या भूमिका अविकृत स्वरूपात त्यांच्यापुढे मांडणे हे या समितीचे मुख्य कार्य. प्रत्येक केन्द्रसमितीने एक प्रतिनिधी निवडावा. मतदारसंघातील सर्व केन्द्राच्या प्रतिनिधींची मिळून एक प्रातिनिधिक मतदारसमिती स्थापन होईल. तिचे अध्यक्ष, चिटणीस व छोटे कार्यकारी मंडळ निवडावे आणि आपल्या मतदारसंघातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीशी सतत संपर्क ठेवून त्याच्या कार्याबद्दल मतदारांच्या अपेक्षा व मत त्याला सतत कळवीत जावे.

अशी संघटना उभारणे कितपत शक्य आहे ? की हे केवळ स्वप्नरंजन आहे ? निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे अशा संघटनेस कितपत सहकार्य मिळेल ? की संघटना आपल्या नियंत्रणाखाली आणण्याच्या कारवाया ते करतील ? कोणत्याही राजकीय पक्षाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या अपक्ष कार्यकर्त्यांनी अशा संघटनेच्या उभारणीत पुढाकार घ्यावा असे वाटते. सूचना विचारार्थ मांडली आहे. ती साकार करणे कितपत शक्य आहे ते कार्यकर्त्यांनी पहावे. □

निवडणुका संपल्या, आता मागे उरल्या आहेत प्रचारकार्यातील कडू–गोड आठवणी

# असाच एक प्रचारदौरा

प्रा. झुंबरलाल कांबळे

विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. महाड-पोलादपूर या मतदारसंघात सुमारे एक लाख मतदार आहेत. तीन उमेदवार उभे होते. जनता–काँग्रेस आणि घनःश्याम तळवटकर यांचा रिपब्लिकन पक्ष. पी. जी. घाटगे हत्ती निशाणी घेऊन या मतदारसंघात अत्यंत जिद्दीने झुंज देत होते. त्यांच्या प्रचाराची सर्व सूत्रे प्राचार्य शि. ना. रामटेके यांनी हाती घेतली होती. आम्ही पाच-सहा प्राध्यापक एक नवीन अनुभव म्हणून हिरीरीने प्रचारकार्यात उतरलो होतो, खास तळवटकरसाहेबांसाठी !

जनता व काँग्रेस या बलाढ्य पक्षांशी झुंज देणे साधी गोष्ट नव्हती. दहा-दहा, बारा-बारा गाड्या रात्रंदिवस राबत होत्या त्यांच्या. हजारो पोस्टर्स, बॅनर्स, तेवढेच मनुष्यबळ आणि पैसा होता त्यांच्याकडे. आमची अवस्था कशी होती ? एकुलता एक टेंपो-स्टेशनवॅगन आणि आत उमेदवारासह पंधरा-वीस जणांचा ताफा ! प्रचाराची साधने व पैशाने गरीब; पण मनाने ताठ ! मानाने जीवन जगण्यासाठी धडपडणारा. रात्रंदिवस फिरणारा. जिथे जिथे टेंपो जाणे शक्य आहे तिथे तिथे जाणारा. पदरमोड करून प्रचारासाठी जिवाचे रान करणारा.

या मतदारसंघाची भौगोलिक रचना घाटावरील एखाद्या मतदारसंघापेक्षा अत्यंत वेगळ्या स्वरूपाची, निसर्गरम्य, अवघड आणि मजेदार आहे. डोंगरांच्या रांगा, दऱ्या, झाडी, मधूनच वाहणाऱ्या नद्या, उपनद्या, ओहळ, पळी, काळांकभिन्न खडक आणि खाडी हे या मतदारसंघाचे खास वैशिष्ट्य. अशा अवघड भौगोलिक रचनेत मधून-मधून गावे वसलेली असतात. दऱ्याखोऱ्यात, डोंगरावर, डोंगरउतारावर, गर्द झाडीत, वेळूच्या बनात, तर अनेक वेळा वैराण खडकावर. आम्ही आमचे लक्ष प्रत्येक गावाच्या बुद्धवाड्यावर केंद्रित केलेले असते. त्यांची वसाहत तर गावापेक्षा दुर्गम ठिकाणी झालेली असते. गावापासून अगदी वेगळी. अडचणीच्या ठिकाणी. गावात विजेचे दिवे असतात; पण अनेक वेळा बुद्धवाड्यापर्यंत पोहचलेले नसतात. तिथे माणसेच राहतात याची जाण सत्ताधाऱ्यांना झालेली नसते. गावापर्यंत कच्चा का असेना रस्ता असतो. बुद्धवाड्यात अनेक वेळा धड पायवाटही नसते. असते ती दगड-धोंड्यांना ठेचाळत, खाचखळग्यातून जाणारी. बौद्धजनतेच्या जीवनाचे प्रतीकच जणू ! रात्रीच्या वेळी अशा वस्तीत जाणे हेच एक दिव्य असायचे; पण प्रचाराचा काळ हा शुक्ल पक्षात आल्याने आकाशात चंद्रोदय झालेला असे. त्याचे स्वच्छ चांदणे पडलेले असे. त्यामुळे आमची अडचण काही अंशी कमी झाली होती.

## धुळीचा ढग

आमचा टेंपो एखाद्या पक्क्या रस्त्याने शक्य तिथवर जायचा. मुंबई-गोवा हा राष्ट्रीय हमरस्ता सोडला तर इतरत्र पक्के रस्ते नाहीतच म्हटले तरी चालेल. एखाद्या कच्च्या रस्त्यावरून आमचा प्रवास सुरू व्हायचा. टेंपोच्या हौदात लाल धुळीचा ढग जमायचा. तो हळूहळू अधिकाधिक दाट होत जायचा. नाका-तोंडात, डोळ्यांत धूळ जायची. अशा वेळी आमची तोंडे बंद होत. कधी हाताने, कधी रुमालाने. गाव कधी येते असे व्हायचे. तास-अर्धा तास असा ढगात प्रवास केल्यावर गाव यायचा. टेंपोचा वेग मंदावायचा. ब्रेक लागला की, पटापट आम्ही खाली उड्या घ्यायचो. कपड्यांवर, केसांवर, गॉगलवर, डोळ्यांवर, अंगावर, लाल धुळीचा जाड थर साचलेला असायचा. खाली उतरल्यावर तोंडे पुसून आम्ही बुद्धवाड्याकडे धूळ झाडीत जात असू. अंगातील शर्ट काढून झटकीत असू. बनियन सुद्धा लाल झालेले असे. तशा अवस्थेतही एकमेकांकडे पाहून हसत असू. पंधरा-वीस मिनिटे-अर्धाएक तास पायपिटी केल्यावर बुद्धवाडा येई !

बुद्धवाड्याची रचना विशिष्ट प्रकारचीच असलेली दिसे. चौकोनी आकाराची घरे. एकाला एक लागून. दहा-बारा, पंधरा-वीस, चाळीस-पन्नास घरांचा पुंजका. एकाच्या अंगणात दुसऱ्याचे अंगण. दगडामातीचे जोते. वर बांबूंचा कुड. लाल मातीने सारवलेला. काही घरांच्या भिंती मातीच्या, विटांच्या. प्लॅस्टर केलेल्या. पुढे बैठका. बैठकीत लाकडी सज्जा. अंगणात मांडव हमखास असणारच. लाकडाच्या मेढींवर वासे आणि बांबू. त्याच्यावर तुराट्या-भाताचा पेंढा. ऊन झिरपणार नाही एवढा दाट. हा मांडव चार-पाच घरांच्या अंगणात पसरलेला. बैठकीसाठी, झोपण्यासाठी, कडक उन्हाचा दाह जाणवू नये म्हणून घरांच्या मालकांनी मुद्दाम मिळून घातलेला. जमीन तयार करून घेतलेली. गुळगुळीत शेणाने सारवून स्वच्छ केलेली. इकडच्या भाषेत ' वलई करून घेतलेली '.

अशा मांडवातच आमची बैठक जमे. आम्ही येणार असल्याचा सुगावा कधीकधी गावकऱ्यांना असे. कुणाच्या तरी ओळखीचा एखादा गाववाला असे, कुणी नातलग असे. धावाधाव करून मांडवात बैठकीसाठी अंथरूण टाकले जाई. अंथरुणाचेही एक वैशिष्ट्य असे. सतरंज्या किंवा धनगरी घोंगड्या त्यात नसत. चादरी असत. खास करून सैनिकांच्या काळ्या कांबळी असत. पन्नास–साठ गावांत फिरलो; पण बैठकीवर अशी कांबळी नाही असे कुठे घडलेच नाही. गावागावातील तरुण सैन्यात असल्याची ती निशाणी होती.

थंड पाणी आणले जाई. प्रथम आम्ही तोंडे, हातपाय धुऊन घेत

असू. केसांवरून ओला हात फिरविताच लाल चिखल हाताला लागत असे. तोंड पुसल्यावर रुमाल लाल रंगाचा होत असे. बैठकीवर गावकरी जमत. आमचे कार्य नंतर सुरू होई.

## आमची भूमिका

बैठकीचे रूपांतर छोटयाश्या सभेत होई. आमची भूमिका लोकांपुढे आम्ही मांडीत असू. स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे झाली. आपण आपली या मतदारसंघातील मते सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाला देत आलो. एकाही राजकीय पक्षाने आपला विचार केला नाही. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी, आपली चळवळ जिवंत ठेवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणाला जो मताचा अधिकार दिला त्याची किंमत विरोधकांच्या लक्षात यावी यासाठी आपला हत्ती उभा आहे. या हत्तीलाच विजयी करा! प्रथम प्राचार्य, एखादा प्राध्यापक किंवा कार्यकर्ता आमची बाजू मांडी. नंतर उमेदवार स्वतःचे म्हणणे लोकांपुढे ठेवीत. एखादा स्थानिक कार्यकर्ता बोले. बहुतेकांना आमचे म्हणणे पटल्यासारखे वाटे. गाववाल्यातला एखादा तरुण उभा राहून आम्हाला वेगवेगळे प्रश्न विचारी. ते आव्हानात्मक असत; पण आमच्या सहकाऱ्यांतील एखादा कार्यकर्ताही त्याला पुरून उरे. गाववाले नंतर चहा देत. कधी कोरा, दुधाचा, कधी साखरेचा कधी गुळाचा आणि तिथून आमचा टेंपो दुसऱ्या गावाच्या दिशेने धूळ उडवीत धावे.

महाडच्या परिसरातील बुद्धवाड्यातून आमची भूमिका लोकांना पटवून द्यायला फारसे अवघड गेले नाही. कारण महाडला होणाऱ्या अनेक सामाजिक कार्यक्रमांना ते येत असतात. आम्ही कोण आहोत हेही त्यांना माहीत असे; पण दूरवरच्या परिसरात आम्ही जाऊ लागलो, तसतसे भूमिका पटवून द्यायला त्रास होऊ लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाभोवती एक अद्‌भुत तेजोवलय आहे. त्यामुळे आमचे काम सोपे झाले होते.

श्री. घनःशाम तळवटकर यांनी या भागात अत्यंत जिद्दीने कार्य केले आहे. महाडचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, तिथे होत असलेला क्रांतिस्तंभ आणि मुंबई–औरंगाबाद येथील शैक्षणिक कार्य यामुळे कोकणातील जनता बाबासाहेबांनंतर त्यांनाच आपला लाडका नेता मानते. त्यामुळेही आमचे काम सोपे झाले होते.

## 'आपली चळवळ विकू नका!'

दि. २२ व २३ फेब्रुवारीला घनःश्याम तळवटकरसाहेबांचा दौरा आयोजित केला होता. दि. २२ ला दुपारी बारा वाजता ते मुंबईहून महाडला आले. एस्. टी. स्टँडवरच्या एका हॉटेलात जेवले आणि लगेच आमच्यासमवेत दौऱ्यावर निघाले. टेंपोच्या जोडीला आज अँबॅसॅडरकारची व्यवस्था केली होती. बीरवाडीमार्गे वाळंजखोऱ्यात धूळ उडवीत गाड्या धाऊ लागल्या. वाळंजखोरे हा रायगडचा दुर्गम प्रदेश. डोंगरांच्या रांगा उघड्या-बोडक्या, वैराण; धूळ आणि दगड-धोंडे. दुपारी दोन वाजता धुळीने पूर्णपणे माखून आम्ही वाळंजच्या बुद्धमंदिरात पोहचलो. साहेब आल्याचे कळताच लोक आनंदाने बेभान झाले. प्राचार्य रामटेके आणि घाटगे यांनी प्रास्ताविक केल्यानंतर तळवटकरसाहेब भाषणास उभे राहिले. त्यांच्या भाषणाचा आशय पुढीलप्रमाणे होता–'महाडला १९२७ साली जी क्रांति झाली ती आपण जिवंत ठेवली पाहिजे. पैशाला आपली चळवळ विकू नका!' बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूरपक्षातर्फे पूर्वी जी निवडणूक लढविली तिच्यात ठाणा–कुलाबा–रत्नागिरी या जिल्ह्यांतील उमेदवार बहुसंख्य होते. मध्यंतरी ही चळवळ थोडी मागे पडली होती. आता नव्या जोमाने पुन्हा सुरू केली आहे. संपूर्ण क्रांतीची कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. समाजातील सर्व वर्ण नष्ट करावेत, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव आणि न्याय या तत्त्वावर नवीन समाज निर्माण करावा ही या क्रांतीची कल्पना होती.'

या बैठकीनंतर दहीवाड, वाकी इथेही बैठका झाल्या. प्रत्येक ठिकाणचे बौद्धजन–गावकरी साहेब आल्याचे बघून आनंदाने अक्षरशहा नाचत असत. दुसऱ्या दिवशीही हाच अनुभव आला.

या दहा–बारा दिवसांच्या दौऱ्यात काही प्रसंग व काही गावे मनात कायमचे घर करून बसली आहेत.

हे एक गाव तुर्भे. सावित्री नदीवरचा नवीनच झालेला छोटा पूल ओलांडून पलीकडे जावे लागते. रस्त्याच्या कडेलाच असलेला बुद्धवाडा. सावित्री नदीला मिळणारी आणखी एक नदी. तिच्या पलीकडे दूरवर मिणमिणता दिवा दिसतो आहे. रात्रीचे ९ वाजले आहेत.

चंद्र आता आकाशात बराच वर आला आहे. आकाश निरभ्र आहे. हवेत किंचित गारवा आहे. दिवसभराचा थकवा जाणवत आहे. दूरवरचा दिवा आम्हाला खुणावीत आहे. तुर्भ्याजवळील एका दुसऱ्या गावातील बुद्धवाडीत आम्ही पायीच निघालो आहोत. चंद्राचे चांदणे–टिप्पूर चांदणे–बरसत आहे. नदीच्या पात्रातील दगडधोंडे, वाळवंट, डोहातील पाणी आणि पायवाट चंद्रमय झाली आहे. आमची पावले अंदाज घेत पात्रातून मार्ग काढीत आहेत. प्रा. तारदाळकर, प्रा. अंबाडे आणि मी सर्वांच्यापुढे आहोत. प्राचार्य रामटेके आमच्यापूर्वी दुसऱ्या किनाऱ्यावर पोहचले आहेत, पात्रावर येऊन मी मागे वळून साथीदारांकडे पाहू लागलो. अत्यंत सुंदर दृश्य दिसत होते. नदीच्या पात्राच्या त्या टोकापासून या टोकापर्यंत सहकाऱ्यांची रांग चाचपडत रस्ता शोधता शोधता चंद्रमय झाली आहे. हे साळवे-गुरुजी, सेवानिवृत्त शिक्षक. काठीच्या आधाराने अशा अडचणीच्या मार्गावरून अवेळी त्यांनी का चाचपडावे? इतर सर्व साथीदारांनी अनोळखी गावाकडे जाण्यासाठी का धडपडावे? हे प्राचार्य रामटेके, प्रा. अंबाडेबंधू, प्रा. तारदाळकर आरामाने ड्यूटीवर जायचे सोडून यांनी अवेळी इथे का चाचपडावे? कोणत्या यंत्रशक्तीने झपाटले आहेत हे तरुण, म्हातारे, कार्यकर्ते? असे प्रश्न मनात रेंगाळत होते. त्यांचे उत्तरही मनात तयारच होते. त्यांची सर्वांची मंत्रशक्ती, प्रेरणा फक्त एकच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांची स्फूर्ती एकच आहे. घनःश्याम तळवटकर. चंद्र वरून मार्गदर्शन करीत आहे. झपाटलेले कार्यकर्ते मार्गक्रमण करीत आहेत.

## चंद्रावरचा ससा

वलंग या गावाकडे आमचा टेंपो वळला आहे. गोपाळबाबा वलंगकरांच्या आठवणी मनात रेंगाळत आहेत. बौद्धसमाजातील पहिले समाजसुधारक गोपाळबाबा वलंगकर. म. ज्योतिबा फुल्यांचे समकालीन. तसलेच बंडखोर, क्रांतिकारक, मिलिटरीत गेले. गोऱ्या

साहेबाने त्यांना तिथेच शिक्षण दिले. एक छोटा लष्करी अधिकारी म्हणून रिटायर्ड झाले. अस्पृश्योद्धारासाठी वेगवेगळ्या चळवळी करू लागले. संस्था स्थापून, कीर्तनाच्या माध्यमातून, लेख-पुस्तके प्रकाशित करून. रात्री १० ची वेळ. अडचणीतून रस्ता काढीत टेंपो चालला आहे. मधूनमधून झाडी लागते आहे. चंद्राचे पिठासारखे चांदणे पाझरते आहे. थंड वारा सुटला आहे. गाडीचे दिवे बघून एक गुबगुबीत ससा गाडीला आडवा येतो. क्षणभर थांबून कान टवकारून दिव्याकडे पाहतो. गाडीचा वेग मंदावतो. टुणकन उडी मारून पळून जातो. शेजारच्या जाळीवजा झाडीत दिसेनासा होतो चंद्रावरच्या सशासारखा. वलंग येते. सगळीकडून डोंगर. त्याच्या उतारावर गाव.

हे तेलंगे. मुकुंदराव आंबेडकरांच्या आईचे माहेर. इथे त्यांची समाधी आहे. गाव डोंगराच्या खाली तर बुद्धवाडा डोंगरमाथ्यावर वसला आहे. मुकुंदराव आंबेडकरांच्या नातेवाइकांच्या घरापुढेच बैठक बसली आहे. हवेतील गारवा सुखद वाटतो आहे. गोविलकर या नावाचे एक गृहस्थ इथे भेटतात. ५०।६० वर्षे वयाचे. नाव ऐकताच मन भूतकाळात प्रवेश करते. १९२७ साली महाडला जो सत्याग्रह झाला त्या वेळी महाडच्या बाजारपेठेत गोविलकर नावाच्या त्या वेळच्या एका महाराचे झोपडीवजा हॉटेल होते. सत्याग्रहाच्या कार्यालयाचे स्वरूप त्याला आले होते. मारामारी झाली तेव्हा अनेकांनी या हॉटेलात आश्रय घेतला होता, त्या गोविलकरांचे हे बंधू !

हे वरचे कापडे. महाड-महाबळेश्वर मार्गावर वसलेले. गाव सडकेला लागून तर बुद्धवाडा डोंगरमाथ्यावर. उन्हाची वेळ; पण महाबळेश्वरचा परिसर असल्याने दाह जाणवत नाही. दुरूनच गर्द झाडी दिसली आणि त्या झाडीतच बुद्धवाडा आहे असे कळताच मन सुखावले. बुद्धवाड्यात गेलो. रस्ता असा नव्हताच. आंबे-फणस आणि अंगणात डोलणाऱ्या केळी बघून थकवा पार नाहीसा झाला. आमची बैठक एका फणसाच्या प्रचंड वृक्षाखालील गार मांडवात पार पडली. इतरत्र फणसाची झाडे होती. कोवळे-कोवळे फणस झाडावर, खोडावर, फांद्यांवर जागा असेल तिथे झुपक्या-झुपक्याने लोंबकळत होते. पोपटी पोपटी रंगाचे, कोवळ्या कोवळ्या काट्यांचे. सर्व झाडावर पोपटांचा थवाच जणू विसावला आहे. त्यांच्याकडे बघून रघुनाथ पंडिताच्या 'नलदमयंती 'मधील पुढील ओळी मनात घोळत होत्या–

'उपरि कंटक साचे
परंतु साचे
जयात सुरसाचे
घोस तसे फणसांचे...'

सकाळपासून रात्री १ वाजेपर्यंत प्रचारदौरा चालला होता. हवेत खूप गारठा पडला होता. पोटात कावळे ओरडत होते. महाड यायला किमान एक-दीड तासाचा तरी अवधी होता. तुडील या गावी टेंपो थांबला. त्या गावचे कार्यकर्ते सोबत प्रचारासाठी होते. त्या वेळी त्यांनी चार-पाच घरच्या गृहिणींना जागे केले. तांदळाच्या भाकरी आणि वांग्याची भाजी असा जेवणाचा बेत केला. रात्री दोन वाजता जेवण उरकून पहाटे तीन-साडेतीन वाजता महाडला परत आलो.

### म्हाताऱ्याची माया

दुपारचे बारा वाजले आहेत. उन्हाचे चटके सहन करीत धारावलीच्या बुद्धवाड्यात गेलो. एक म्हातारा–असेल साठीतला. मांडवाच्या सावलीत बसून वेळू चिरीत होता. आमची माहिती त्याला कालच कळली होती. आम्हाला पाहून घरात गेला. एक शाल आणली. कधीकाळी उदी रंग असलेली. असंख्य ठिकाणी फाटलेली तरीही व्यवस्थित शिवलेली. नको नको म्हणता खाली अंथरली. तिच्यावर बसायची विनंती केली. त्याच्या प्रेमाने आम्ही भारावून गेलो. एखाद्या स्पंजच्या गादीवर बसावे तसे बसलो. आरामात ! तो घरात गेला. नव्या जर्मनच्या टोपात थंडगार पाणी आणले. त्यामुळे आमची मने तृप्त झाली.

असा हा आमचा प्रचारदौरा. अनेक आठवणी, नवीन अनुभव मनात रेंगाळत ठेवून संपलेला. नवीन विचार देऊन गेलेला. ☐


## साप्ताहिक माणूस

( मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन )
( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : पुणे |
| २. प्रकाशन काल | : साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : श्री. ग. माजगावकर<br>: १०२५ सदाशिव, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व | : भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नावे व पत्ते | : राजहंस प्रकाशन<br>: १. ब. मो. पुरंदरे १०२५ सदाशिव, पुणे ३०<br>: २. श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.
प्रकाशकाची सही

दिनांक ११ मार्च १९७८ श्री. ग. माजगावकर

परराष्ट्रीय घडामोडी

# रशियाच्या कळसूत्री बाहुल्या

## हॉर्न ऑफ आफ्रिका

चंद्रशेखर पुरंदरे

अमेरिकेचा परराष्ट्र व्यवहार सेक्रेटरी सायरस व्हान्स याने नुकत्याच काढलेल्या पत्रकानुसार अमेरिका आणि रशिया यापुढे इथिओपिआ आणि सोमाली यांच्या युद्धात ढवळाढवळ करणार नाहीत किंवा शस्त्र-पुरवठाही करणार नाहीत. इथिओपिआ आणि सोमाली यांच्यातील युद्धाला ऑगस्ट १९७७ पासून सुरुवात झाली. दिवसेंदिवस परिस्थिती गंभीरच होत चाललेली आहे. ती आटोक्यात आणण्याचा हा प्रयत्न.

इथिओपिआ व सोमाली दोन्ही एके काळी रशियाची अंकित राष्ट्रे; पण सोमाली व रशियाचे नंतर बिनसले आणि आज हॉर्न ऑफ आफ्रिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशात पाय रोवण्यासाठी आतुर असणारा रशिया इथिओपियाला आपल्या तालावर शेजारी राष्ट्र सोमालीच्या विरुद्ध मन मानेल त्याप्रमाणे नाचवीत आहे. मागच्याच वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये रशियनांना वारंवार चेतावणी देऊनही इथिओपिआकडे चाललेला रशियन शस्त्रांचा ओघ जेव्हा थांबत नाही असे दिसले; तेव्हा सोमालीच्या अध्यक्षाने रशियनांना हाकलून दिले. १९७४ पासूनचा सोमाली–रशिया मैत्री–करारही त्यामुळे संपुष्टात आला. मग रशियाला लायसन्स मिळाल्यासारखेच झाले. ओगाडेन हा इथिओपिया आणि सोमाली यांच्या सीमेवरचा प्रदेश. या प्रदेशात सोमालीने बरीच खोलवर मुसंडी मारली आहे. तो प्रदेश आमचाच आहे असा त्यांचा दावा आहे. वेस्टर्न सोमाली लिबरेशन फ्रंट हा सैन्याचा विभाग आधी हा प्रदेश लढवीत होता; पण आता सोमालीचे अधिकृत सैन्यच या भागात उतरले आहे. प्रमुख युद्ध जिजिगा या प्रदेशात चालू आहे. इथिओपिया आता पहिल्या हल्ल्याहून सावरलेला आहे आणि सोमालीला यापुढचे युद्ध चांगलेच जड जाणार आहे. एकूण चाळीसहजार सैन्य इथिओपिआ-तर्फे उतरले आहे. त्यांना दीड हजार रशियन सल्लागारांची मदत आहे. शिवाय क्युबन्स निराळेच. क्युबाचे जवळजवळ दोन हजार अधिकारी प्रत्यक्ष युद्धात आहेत एक हजार पिछाडीवर आहेत, आणि आणखी तीन ते सहा हजार युद्धात येतील असा अंदाज आहे. इथिओपिआपाशी अत्याधुनिक रशियन शस्त्रे व ती हाताळायचे शिक्षण देणारे तज्ज्ञ असल्याने इथिओपिआचा युद्धावर वरचष्मा आहे. विरुद्ध बाजूच्या सोमालीचे चार डिविजन सैन्य युद्धात उतरले आहे; पण जुनाट शस्त्रे आणि मोडकळीला आलेली मिग विमाने यांच्या जोरावर सोमाली फार काळपर्यंत तग धरू शकणार नाही. जिजिगा हे खेडे मिळविणे ही दोन्ही बाजूंच्या सैन्याच्या प्रतिष्ठेची गोष्ट होऊन बसली आहे. हर्गेशिया या अन्तर्भागात असणाऱ्या केन्द्रात सोमालीचा राखीव फौजफाटा आहे. मागच्या ऑगस्ट-मध्ये सोमालीने घेतलेले जिजिगा खेडे मिळविण्यासाठी इथिओपिआचा आटापिटा चाललेला आहे. करा यार्दा खिंडीतून सैन्य घुसवून त्याच्या पायथ्याशी असणाऱ्या या खेड्याला दोन्ही बाजूंनी घेरण्याचा प्रयत्न चाललेला आहे.

### सोमालीची अन्तर्गत परिस्थिती

सिआदबार हा सोमालीचा अध्यक्ष. तो आता अन्तर्गत असंतोषाचे लक्ष्य होऊ पहात आहे. ओगाडेनचे ताब्यात आलेले वाळवंट सोमालीचा अविभाज्य भाग करू न शकल्या-बद्दल त्याला दोषी धरण्यात येत आहे. आता परिस्थिती पूर्णपणे हातातून गेली आहे. इथिओपिआ आज ना उद्या स्वतःच्या इच्छे-प्रमाणे तहाच्या किंवा शरणागतीच्या अटी सोमालीवर लादणार हे उघड आहे. त्यामुळे युद्धक्षेत्रातून अनेक हताश आणि चिडलेले सोमाली निर्वासित परत येणार हे स्पष्ट आहे. 'ग्रेटर सोमाली' या घोषणेवर बारचे प्रेम आहे; पण सोमाली ग्रेटर होण्याचे सोडाच, आहे तोही त्याला शाबूत ठेवता येईल की नाही याची शंकाच यावी. हे स्वप्न नष्ट झाल्याने सीमेवरून परतलेल्या हजारो निर्वासितांमुळे बारला सत्तात्याग करावा लागेल असा अंदाज आहे.

जर जिजिगाजवळच्या युद्धाचा शेवट सोमालीच्या विरोधात गेला, तर इथि-ओपिआ अनेक युद्धकैदी पकडील. त्यांचा मोबदला म्हणूनही जिंकलेला बराच भूप्रदेश सोडून द्यावा लागेल. युद्धोत्तर वाटाघाटीत तर सोमालीला नाक मुठीत धरून इथि-ओपिआ म्हणेल ते मान्य करावे लागेल इतकी त्याची परिस्थिती आज केविलवाणी झाली आहे.

### इथिओपिआची अन्तर्गत परिस्थिति

रशियाने इथिओपिआला मानसपुत्रच मानून सर्व तऱ्हेच्या शस्त्रास्त्रांचा व सैनिकी प्रशिक्षणाचा वर्षाव करायचे ठरविले असले तरी इथिओपिआ त्या लायकीचा देश राहिलेला नाही. इथिओपिआची राजधानी आदिस अबाबामधून तर प्रतिदिनी रक्ताचे पाट वाहात आहेत. प्रतिक्रांतिवाद्यांवर हल्ला या नावावर राजरोस गुंडगिरी चालू आहे. 'काबेला' या नावाचे तथाकथित संरक्षण-पथक अस्तित्वात आहे. हे पथक आदिस-अबाबामध्ये काही शाळा, आरोग्यकेन्द्रेही चालविते; पण प्रामुख्याने रक्तपात हेच त्याचे उद्दिष्ट. डॉ. आलेमू अबेबे हा आदिसअबा-बाचा महापौर. तो मागच्याच नोव्हेंबरमध्ये महापौर झाला. वैचारिक बांधिलकीचा तो कट्टर पुरस्कर्ता आहे. इथिओपिआचा राजा हेले सिलासी याच्या खुनानंतरच्या वर्षभरात इथिओपिआत अराजक माजले. १९७६ च्या मध्याच्या आसपास त्याला यादवीचे स्वरूप

प्राप्त होऊन रस्त्यावर मुडदे पडू लागले. प्रमुख दोन गट. पहिला इथिओपिअन पीपल्स रिव्होल्यूशनरी पार्टी (EPRP) आणि दुसरी ऑल इथिओपिअन्स सोशॅलिस्ट युनियन ( मेझो ). या दुसऱ्या संघटनेचा प्रमुख कर्नल मेंगिस्त्यू होता. तोच आज इथिओपिआचा सर्वेसर्वा आहे. मेंगिस्त्यूने आपले राजकीय स्पर्धक आणि विरोधक फारच सोप्या उपायाने हातावेगळे केले आहेत. तो उपाय म्हणजे ठार मारणे जो मध्ये येईल त्याला कापून काढणे एवढेच मेंगिस्त्यू मानतो आणि करतो.

कर्नल हेले मरिअम मेंगिस्त्यूने नोव्हेंबर १९७४ मध्ये जनरल अमान आंदोमला उडवला, जनरल तेफेरी बान्तेला १९७६ फेब्रुवारीत उडवला आणि १२ नोव्हेंबर १९७७ ला कर्नल आत्नाफू आबेतेला हातावेगळा ( व जगावेगळा ) केला. त्यामुळे सध्या मेंगिस्त्यू बोले इथिओपिआ हाले अशी परिस्थिती आहे.

पण एरिट्रियाचा प्रश्न इथिओपिअन सरकारला स्वस्थ बसू देणार नाही. अन्तर्गत बंडाळीमुळे सोमालीलाही फारसा शह देता येत नाही. यातच मेंगिस्तूचा शेवट आहे.

## आन्तरराष्ट्रीय तणाव

रशियाने फार मोठ्या तयारीनिशी हस्तक्षेप केल्याने पाश्चिमात्य जगाचे लक्ष वेधणे अपरिहार्यच होते; पण पाश्चिमात्य जग अनेकदा नको तिथे नाक खुपसून घेऊन चटके बसल्यामुळे इतके सावध झाले आहे की, त्यामुळेच हा प्रश्न चिघळला आहे.

संपूर्ण सैनिकी मदत, आर्थिक आणि तांत्रिक सल्लागार रशियाने इथिओपिआत ओतले आहेत. जिथे रशियाचे लोक नाहीत, तेथे क्युबन्स हजर आहेत. सुएझ कालव्याचा ताबा घेऊन हिंदी महासागराचे नियंत्रण करणे आणि आफ्रिकेच्या किनाऱ्यावर तळ उभारून केपवरून जाणारा सागरी मार्ग आधिपत्याखाली आणणे यायोगे रशिया युरपची दळणवळणव्यवस्था व व्यापार अडवू शकतो. सौदीअरेबियाने हा भावी धोका ओळखून स्पष्ट शब्दांत निषेध नोंदविलेला आहे.

इराण आणि कॉन्झर्वेटिव अरब राष्ट्रांनी सोमालीला पाठिंबा दर्शविला आहे. सोमाली मार्क्सिस्ट असला तरी मुस्लिम आहे आणि हिन्दी महासागरावर वर्चस्व मिळवण्याच्या रशियाच्या महत्त्वाकांक्षेचा बळी आहे असे या राष्ट्रांचे मत आहे या इथिओपिआ-सोमाली युद्धात इस्राएलची भूमिका मनोरंजक आहे इस्राएल रशियाच्या बाजूने इथिओपिआला पाठिंबा देत आहे. त्यामुळे इस्राएलने त्याच्या स्वतःच्या केवळ विरोधासाठीच स्थापन झालेल्या त्रिपोली अलायन्स समितीला पाठिंबा दिलेला आहे. तर सध्या प्रेमात असणाऱ्या इजिप्तशी विरोध पत्करला आहे. ब्लॅक आफ्रिकेत रशियाचा कट्टर वैरी असणारा केनिया या युद्धात इथिओपिआचा आणि पर्यायाने रशियाचा समर्थक बनला आहे. कारण ग्रेटर सोमाली अस्तित्वात आल्यास केनियाची ईशान्य सीमा धोक्यात येते.

## मध्यपूर्व

आज अरब राष्ट्रांइतके खचलेले कोणीच नसतील. आपापसातल्या हाणामाऱ्यांनी ते पार कोलमडून पडलेले आहे. चार प्रमुख गट त्यांच्यात अस्तित्वात आहेत. पहिला अमेरिकावादी. ह्याचा प्रमुख ईजिप्त व ईजिप्तचा सादात. सादात लिबियातील आणि इथिओपियातील रशियन हस्तक्षेपाला युद्धानेच उत्तर देऊ इच्छितो. त्याच्या मते संपूर्ण आफ्रिकेची कम्युनिस्टविरोधी आघाडी उभारून या हल्ल्याला उत्तर दिले पाहिजे. दुसरा गट रशियावादी. यात वर सांगितल्याप्रमाणे केनिया, इस्राएल स्वतःच्या खाजगी कारणांसाठी येतात. त्रिपोली अलायन्सचे सभासद इस्राएलने त्यांना दिलेल्या पाठिंब्याकडेही साशंकतेनेच पहातात. इस्राएलने आतापर्यंत इतके तडाखे दिले आहेत की ताक सुद्धा त्यांना फुंकूनच प्यावे लागते. आफ्रिकेवर जास्तीत जास्त सत्ता गाजविण्याची इस्राएलची इच्छा त्यांना त्यात दिसते. इराण, मोरोक्को, ट्युनिशिया आणि सुदान अर्थातच सादातबरोबर म्हणजे अमेरिकेच्या बाजूने आहेत. त्यातसुद्धा प्रत्येक राष्ट्राचे कारण पहाणे मनोरंजक आहे. सीरिआला इस्राएलची भीती, अल्जीरिआला मोरोक्कोची भीती, लिबियाला ईजिप्तची, दक्षिण येमेनला इराण आणि सौदीअरेबियाची भीती अशी अंतर्गत खेचाखेची आहे.

तिसरा गट अलिप्त राष्ट्रांचा. यात बहुतेक तेलसंपन्न गल्फ राष्ट्रे येतात आणि चौथा इराकचा; पण याचा फारसा प्रभाव नाही.

अशा रीतीने शक्तींचे अस्पष्ट ध्रुवीकरण झालेले आहे.

१९ फेब्रुवारीला मात्र एक धक्कादायक घटना घडली. इस्राएलचा परराष्ट्रमंत्री मोशे दायानने इस्राएल इथिओपिआला लष्करी मदत करीत आहे हे गुपित फोडल्याचे कारण पुढे करून सर्व इस्राएलींना इथिओपिआतून हाकलून देण्यात आले. ही घोषणा १९ फेब्रु. ला टीव्हीवर करण्यात आली. १९ फेब्रु. लाच सोमालीचा अध्यक्ष सिआद बार याने अरब राष्ट्रांना सोमालीच्या सुटकेसाठी येण्याची याचना केली. अरबलीगचा जनरल सेक्रेटरी मोहम्मद रिआद याला हा संदेश मिळाला. दरम्यान इराणने नैरोबीतील आपली वकिलात १८ फेब्रु. ला बंद केली आणि केनियातल्या राजदूताला परत बोलाविले. इराणचा या युद्धात हात असल्याचा केनियाने आरोप केला होता. त्याचा निषेध म्हणून ही कारवाई झाली. तिकडे क्युबाचा उपाध्यक्ष राफेल रोद्रिगुएझ कार्लोस याने सोमालीमध्ये क्युबाचे सैन्य घुसणार नाही अशी परत एकदा ग्वाही दिली.

अशी अत्यंत गुंतागुंतीची व चमत्कारिक परिस्थिती निर्माण झालेली आहे. युरपच्या उदासीनतेमुळे त्यात भर पडत आहे. आजच रशियाचा जनरल ग्रिगरी बारिसोव ओगाडेन विभागात कार्यक्षम आहे. नोव्हेंबरपर्यंत सोमालीच्या सैन्याचा प्रशिक्षण अधिकारी असणारा हा जनरल आता त्यांच्याच विरुद्ध डावपेच लढवीत आहे. या संदर्भात सोमालीच्याच नव्हे तर इथिओपिआच्याही अस्तित्वालाच धोका पोचला आहे. कारण रशियावर अवलंबून रहाणे असहाय करण्यापर्यंत महाग गेलेले आहे.

*तात्पर्य, रशिया दोन्ही देश घशात घालून* हिन्दी महासागरांच्या क्षेत्रात अमेरिकेला जबरदस्त शह देईल असा अंदाज करण्यास जागा आहे.

☐

कथा

# बंधन-मुक्ती

मूळ लेखक : टॉलस्टॉय । अनुवाद : दे. य. ठोंकळ

अक्सिओनोव एक उमदा देखणा तरुण होता. गिटार वाजविण्याचा त्याला छंद होता. तरुण वयातच त्याला पिण्याची चटक लागली होती; परंतु लग्न होताच त्यानं दारू सोडली.

उन्हाळ्याचे दिवस होते. अक्सिओनोव आळसून गेला होता. आळस घालविण्यासाठी मेनिझनी येथील जत्रेला जाण्याचं त्यानं ठरविलं. त्यानं मनाशी विचार केला की, फिरणंही होईल आणि मालाची विक्रीसुद्धा भरपूर होईल. घोड्यावर माल लादून तो तयार झाला. इतक्यात त्याची पत्नी म्हणाली–' हे बघा, आज तुम्ही जत्रेला जाऊ नका. काल रात्री मला फार वाईट स्वप्न पडलं आहे ! '

तो हसून म्हणाला–' तू निष्कारण घाबरते आहेस ! '

' खरंच तुम्ही जाऊ नका. मी फार वाईट स्वप्न बघितलं आहे. मला स्वप्नात असं दिसलं की, तुम्ही व्यापार करून परत आला आहात आणि जेव्हा तुम्ही डोक्यावरची हॅट काढलीत तेव्हा तुमचे केस अंबाडीसारखे पांढरे शुभ्र झाल्यासारखे दिसले ! '

तो पुन्हा हसत म्हणाला–' अग वेडे, हे तर चांगलं स्वप्न आहे, तू मुळीच काळजी करू नकोस ! मी जत्रेत बऱ्याचशा सामानाची विक्री करून तुझ्यासाठी एखादी चांगली वस्तू घेऊन येईन ! ' असं म्हणून तिच्या गुलाबी गालावर हळुवार स्पर्श करून तो निघाला.

थोडं दूर गेल्यावर रस्त्यात त्याला एक व्यापारी भेटला. दोघे बरोबर निघाले. रस्त्यात गप्पागोष्टी करताना त्यांची मैत्री जमली. प्रवासात रात्र झाली तेव्हा दोघे एका धर्मशाळेत थांबले.

अक्सिओनोव सकाळी लवकर उठला. त्यानं धर्मशाळेचं बिल दिलं आणि त्याच्याबरोबर आलेल्या व्यापाऱ्याची वाट न बघता तो पुढच्या प्रवासाला निघाला.

बरेच दूर गेल्यावर विश्रांतीसाठी तो थांबला. त्यानं आपल्या घोड्याला पाणी पाजलं. सावलीत बसून विश्रांती घेऊ लागला. मनोरंजनासाठी त्यानं आपलं गिटार घेतलं आणि हळू मंद लयीत एक रोमँटिक धुन वाजवू लागला. तोच एक पोलिसअधिकारी आपल्या शिपायांच्यासह येताना त्याला दिसला. पोलिसअधिकारी जवळ आला आणि त्याला निरनिराळे प्रश्न विचारू लागला. अक्सिओनोव त्याच्या प्रश्नांची उत्तरे देऊ लागला. त्यानं त्या पोलिसअधिकाऱ्याला विचारलं–' तुम्ही अशा पद्धतीनं माझी विचारपूस का करीत आहात ? ' त्याच्या प्रश्नाचं उत्तर न देताच त्या पोलिसअधिकाऱ्यानं पुन्हा प्रश्नांचा भडिमार केला –' काल तू कोठे मुक्कामाला होतास ? तुझ्याबरोबर आणखी कुणी व्यापारी होता का ? सकाळी तू त्याला बघितलं होतंस का ? धर्मशाळेतून फार लवकर बाहेर का पडलास ? '

पोलिसअधिकाऱ्याचे प्रश्न ऐकून अक्सिओनोव हैराण झाला. तरी सुद्धा प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तो देत राहिला. शेवटी पोलिसअधिकारी दरडावून म्हणाला –

' धर्मशाळेत तुझ्याबरोबर असलेल्या त्या व्यापाऱ्याचा खून झालेला आहे. कुणी तरी त्याच्या गळ्यावर सुरा फिरविला आहे. आम्ही तुझी झडती घेणार आहोत ! '

पोलिसअधिकारी त्याचं सामान उलट सुलट करून बघू लागला. अक्सिओनोव शांतपणे बघत होता. इतक्यात त्या पोलिसअधिकाऱ्यानं त्याच्या गाठोड्यातून एक सुरा अक्सिओनोवच्या पुढे धरीत पोलिसअधिकाऱ्यानं दरडावून विचारलं – ' हा सुरा कोणाचा आहे ? आणि त्याच्यावर रक्ताचे डाग कसे ? '

अक्सिओनोव भ्रमिष्टासारखा डोळे फाडून बघतच राहिला ! त्याच्या तोंडून अडखळत शब्द फुटले...' मला....माहीत...नाही.... माझा...नाही ! ' पोलिसअधिकाऱ्यानं त्याच्यावर खुनाचा आरोप ठेवला आणि त्याला अटक करून घेऊन गेला.

अक्सिओनोव शपथा घेऊन सांगत होता की मी खून केला नाही. पोलिसअधिकाऱ्यानं त्याला जुमानलं नाही. त्याचा चेहरा पांढरा फट्ट पडला. तो थरथर कापत होता. त्याच्यावर खटला भरण्यात आला. लवकरच खटल्याचा निकाल लागला. व्यापाऱ्याची हत्या करून त्याच्याजवळचे वीस हजार रुबल चोरल्याच्या आरोपावरून त्याला जन्मभर कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्याच्या पत्नीची केविलवाणी अवस्था झाली. काय करावं हे तिला सुचेना. लहान मुलांचं कसं होईल ? मी असहाय अबलेनं आता काय करावं ? काळजी आणि दुःखानं तिला ग्रासून टाकलं.

मुलांना घेऊन ती तुरुंगात गेली. प्रथम तिला अक्सिओनोवला भेटण्याची परवानगी नाकारण्यात आली; परंतु तिनं रडून आक्रोश केल्यामुळे परवानगी देण्यात आली. पतीला कैद्याच्या रूपात बघून तिला भोवळ आली. थोड्या वेळानं ती शुद्धीवर आली. तेव्हा ती म्हणाली–' बघा, माझं स्वप्न खरं झालं की नाही ? त्या दिवशी तुम्ही जायला नको होतं ! ' त्याच्या केसात आपली नाजूक बोटं फिरवीत तिनं विचारलं–' मला तरी खरं सांगा की हा खून तुम्हीच केला आहे ना ? '

दोन्ही हातांनी तोंड झाकून तो रडू लागला. हुंदके देत म्हणाला–' तर तू सुद्धा माझा संशय घेऊ लागलीस ! ' त्याच वेळी एक शिपाई आला. वेळ संपल्याचं त्यानं सांगितलं. मुलांना घेऊन ती तुरुंगाच्या बाहेर आली.

स्वतःच्या पत्नीनं सुद्धा संशय घेतल्यामुळं त्याला फार दुःख झालं. त्यानं विचार केला की, परमेश्वराशिवाय सत्य घटना कोणालाच माहीत नाही. मला त्या परमेश्वराचीच प्रार्थना करायला हवी.

तुरुंगातून सुटण्याची आशा त्यानं सोडून दिली. सगळा वेळ तो परमेश्वराच्या प्रार्थनेत घालवू लागला.

लवकरच अक्सिओनोवला दुसऱ्या भया-

नक कैद्याच्याबरोबर सैबेरियाला पाठविण्यात आलं. सव्वीस वर्षे तो सैबेरियाच्या तुरुंगात होता. त्याचे केस अंबाडीसारखे पांढरे झाले. तो आता फार कमी बोलत होता. त्याच्या ओठांवरचं हसू मालवलं होतं. तो खिन्न दिसत होता. तरी सुद्धा परमेश्वराच्या प्रार्थनेत त्यानं खंड पडू दिला नाही. तुरुंगात बूट तयार करायला तो शिकला होता. या कामातून जे पैसे मिळत त्यातून त्यानं 'लाइफ ऑफ सेंट्स' नावाचं पुस्तक विकत घेतलं. मधून मधून ते पुस्तक तो वाचीत असे. रविवारी तुरुंगाच्या चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जात असे.

जेलचे अधिकारी त्याच्यावर प्रेम करीत होते. त्याचे साथीदार कैदी श्रद्धेनं, आपुलकीनं त्याच्याकडे बघत असत. त्याला दादा आणि महात्मा अशा नावांनी संबोधीत असत. अधिकाऱ्याकडे काही गाऱ्हाणं सांगायचं असेल तर हे कैदी त्याच्या मार्फत सांगत असत. आपसात भांडण झालं तर तंटा मिटविण्यासाठी ते त्याच्याकडे येत. या सव्वीस वर्षांच्या काळात अक्सिओनोबला आपल्या कुटुंबाविषयी काही सुद्धा कळलं नाही.

एक दिवस नवीन कैद्यांचं एक टोळकं त्या जेलमध्ये आणण्यात आलं. संध्याकाळी जुने कैदी नव्या कैद्यांचं नावगाव विचारू लागले. त्यांच्या अपराधाविषयी विचारू लागले. अक्सिओनोब तिथेच एका कोपऱ्यात बसला होता. नव्या कैद्यांच्या मधे साठ वर्षांचा बलदंड शरीराचा एक कैदी होता. आपल्या करड्या आवाजात तो सांगत होता—'मित्रहो, एकदा खुंट्याला बांधलेला घोडा सोडल्याच्या आरोपावरून मला अटक करण्यात आली होती. त्या वेळी मी हजारदा सांगितलं की, बाबांनो, घोडा माझ्या मित्राचा आहे. लवकर घरी जाण्यासाठी मी तो सोडला आहे. मित्राचा घोडा सोडल्यामुळे चोरीचा प्रश्न येत नाही. तरी सुद्धा कोणीही माझं ऐकून घेतलं नाही आणि अपराध केलेला नसताना मला पकडलं आणि एकदा खरोखर गुन्हा केला होता तर मला कुणी विचारलं सुद्धा नाही! आहे की नाही गंमत?'

'तुम्ही कोणत्या गावचे आहात?' कुणी तरी विचारलं.

'मी व्लडीमीरचा राहणारा आहे. माझं नाव माकर आहे. मला लोक सेमियोनियन सुद्धा म्हणतात.'

त्या कैद्याच्या तोंडून व्लडीमीर हे नाव ऐकताच अक्सिओनोबनं गुडघ्यात घातलेलं डोकं वर काढून त्या कैद्याला विचारलं—'का रे बाबा, व्लडीमीरच्या अक्सिओनोबविषयी तुला काही माहिती आहे का?

त्याच्या कुटुंबातील लोक जिवंत आहेत की नाहीत?'

'त्याच्या कुटुंबाविषयी मला सर्व काही कळलं आहे. त्याची मुलं फार श्रीमंत झाली आहेत; परंतु त्यांचा बाप कुठल्या तरी तुरुंगात शिक्षा भोगतो आहे!'

थोडं थांबून त्या कैद्यानं अक्सिओनोबला विचारलं—

'तुम्ही इथे कसे आलात?'

एक दीर्घ उसासा टाकून अक्सिओनोब म्हणाला—

'एका अपराधामुळे मी सव्वीस वर्षे या तुरुंगात अडकलोय!'

'कोणत्या अपराधामुळे अडकलात?'

करुण स्वरात अक्सिओनोब म्हणाला—'आता त्या गोष्टीची चर्चा करण्यात काही अर्थ नाही!'

अक्सिओनोब बोलायचं थांबला. गप्प झाला. इतर कैद्यांनी त्याची सर्व कथा माकरला सांगितली. अक्सिओनोबची कथा ऐकून माकर आश्चर्यचकित झाला. तेव्हा इतर कैद्यांनी माकरला विचारलं की, तुम्ही अक्सिओनोबला पूर्वी कुठे बघितलं होतं काय?' परंतु माकरने त्यांना स्पष्टपणे उत्तर दिलं नाही. कैद्यांच्या प्रश्नाकडे लक्ष न देता तो अक्सिओनोबला म्हणाला—'मित्रा, मोठ्या विचित्र-योगायोगानं आपली इथे भेट झाली!' त्याचं हे असं बोलणं ऐकून अक्सिओनोबला वाटलं की खऱ्या गुन्हेगाराची याला माहिती असावी. म्हणून त्यानं विचारलं—'या घटनेविषयी तू बरंच काही ऐकलं असशील?'

'ऐकलं आहे ना! वेगवेगळ्या प्रकारच्या अफवा ऐकण्यात आल्या; पण त्या ऐकून आता एक तपाचा काळ लोटला आहे. तेव्हा सर्व काही मी विसरून गेलो आहे!'

'खरा खुनी कोण होता याविषयीसुद्धा तू काही तरी ऐकलं असशील?'

माकर मोठ्यांदा हसून म्हणाला—'ज्याच्या गाठोड्यात सुरा सापडला तोच खरा खुनी असणार! तुमच्या गाठोड्यात सुरा ठेवणं दुसऱ्या कोणालाही शक्य झालं नसतं. कारण ते गाठोडं तुम्ही उशाशी घेऊन झोपला होतात. त्यात सुरा ठेवण्याचा प्रयत्न केला असता तर तुम्हाला निश्चितच जाग आली असती!'

माकरचं बोलणं ऐकून अक्सिओनोबच्या मनात त्याच्याविषयी दाट शंका आली. तो गुपचुप तिथून निघून गेला. त्या रात्री त्याला झोप आली नाही. पत्नी आणि मुलांचे चेहरे त्याच्या समोर दिसू लागले. तो त्रस्त झाला. संतापला. माकरच्याविषयी त्याचा राग दर क्षणाला वाढू लागला. तो अत्यंत क्रोधित झाला. रात्रभर त्यानं परमेश्वराचं ध्यान करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचं मन शांत झालं नाही.

दुसऱ्या दिवशी त्यानं माकरचं तोंडसुद्धा बघितलं नाही. तो आतून धुमसत होता. अशा तऱ्हेनं पंधरवडा गेला. अक्सिओनोब बेचैन झाला होता. रात्री त्याला नीट झोप लागत नसे.

त्या दिवशी रात्रीची वेळ होती. अक्सिओनोबच्या खोलीच्या भिंतीला खालून कोणी तरी भोक पाडीत होतं. अक्सिओनोब कुतूहलानं बघत होता. भोक मोठं झालं आणि त्या भोकातून एकाएकी माकर आत आला. बाहेर येताच त्यानं अक्सिओनोबवर झडप घेतली. अक्सिओनोबला घट्ट पकडून दरडावून माकर म्हणाला—'ए म्हाताऱ्या, तुझं तोंड बंद ठेव! तू जर जेलच्या अधिकाऱ्याजवळ काही बोललास तर ते माझा जीव घेतील आणि तू जर तसं केलंस तर मी तुला मारून टाकीन! या प्रकरणात गप्प राहिलास तर तुरुंगाच्या भिंतीखाली भोक पाडून तुला बाहेर काढीन! आपणा दोघांना पळून जाता येईल!'

आपल्या शत्रूकडे बघून अक्सिओनोब संतापानं लाल झाला. माकरचा हात झटकून तो म्हणाला—'जेलमधून पळून जाण्याची माझी मुळीच इच्छा नाही. तू तर मला फार पूर्वीच मारून टाकलं आहेस. आता आणखी काय मारणार आहेस! परमेश्वर मला जो आदेश देईल त्याप्रमाणे मी करीन! परमेश्वराची इच्छा असली तर तुझं गुपित मी अधिकाऱ्यांना सांगेन!'

दुसऱ्या दिवशी भिंतीला पाडलेलं भोक अधिकाऱ्यांच्या नजरेस आलं. बारकाईनं चौकशी केली असता अधिकाऱ्यांना असं कळून आलं की कोणी तरी जेलच्या तटाला सुद्धा भोक पाडून पळून जाण्याचा प्रयत्न करीत आहे. जेलच्या मुख्य अधिकाऱ्यांनी सर्व कैद्यांना बोलावून घेतलं. भोक कुणी पाडलं याची चौकशी सुरू केली; पण कुणीही कबूल झालं नाही. शेवटी जेलच्या अधिकाऱ्यानं अक्सिओनोबला विचारलं—

—'तू प्रामाणिक मनुष्य आहेस. परमेश्वराला साक्षी ठेवून खरं सांग की हे भोक कुणी पाडलं?'

'अक्सिओनोबचे ओठ थरथरले. बराच वेळ तो काही बोलू शकला नाही. त्याच्या मनात उलटसुलट विचार घोळू लागले. त्यानं एक विचार केला की ज्यानं आपलं जीवन उद्ध्वस्त केलं त्याला कशासाठी वाचवायचं? आणि मी जर माकरचं गुपित सांगितलं तर जेलचे अधिकारी त्याला ठार करतील! आता माकरला कितीही कठोर शिक्षा मिळाली तरी त्याचा मला काय फायदा आहे?'

'अक्सिओनोब विचार करण्यात गढून गेला असता अधिकाऱ्यानं पुन्हा तोच प्रश्न विचारला. अक्सिओनोबनं एक वेळ माकरकडे बघितलं आणि म्हणाला— 'हुजूर, मी काही सांगू शकत नाही. मी काही सांगू नये अशीच परमेश्वराची इच्छा आहे. या प्रकरणात जी शिक्षा द्यायची असेल ती मला द्या!'

खरा गुन्हेगार शोधून काढण्यासाठी अधिकाऱ्यांनी खूप प्रयत्न केले; परंतु अक्सिओनोबनं त्यांना काहीएक सांगितलं नाही.

त्या रात्री लपतछपत माकर पुन्हा अक्सिओनोबच्या खोलीत आला आणि त्याच्याजवळ बसला. तिरस्कारानं त्याच्याकडे बघत अक्सिओनोब म्हणाला— 'आता तुला आणखी काय पाहिजे? इथे कशासाठी आलास?' माकर गप्प बसून होता. तो काही सुद्धा बोलला नाही. अक्सिओनोब उठून उभा राहिला आणि रागानं म्हणाला— 'चल चालता हो इथून! नाही तर मी पहारेकऱ्याला बोलवीन!'

माकर अगदी पडत्या आवाजात म्हणाला— 'मला माफ करा दादा!'

'कशाबद्दल माफी मागतोस?'

'दादा, मीच त्या व्यापाऱ्याचा खून केला होता. मोठ्या हुशारीनं सुरा तुमच्या गाठोड्यात ठेवला. मी तुमचा सुद्धा खून करणार होतो; परंतु त्याच वेळेस धर्मशाळेच्या बाहेर कसला तरी आवाज झाला, त्यामुळे मला ते शक्य झाले नाही. सुरा तुमच्या गाठोड्यात ठेवून मी खिडकीतून उडी टाकून पळून गेलो!'

काय बोलावं ते अक्सिओनोबला कळत नव्हतं. माकरच पुढे म्हणाला— 'मला माफ करा दादा! खरा गुन्हेगार मीच आहे. आता मी अपराध कबूल करतो. त्यामुळे तुम्हाला मुक्त करण्यात येईल!'

'अपराध कबूल करणं आता तुला फार सोपं आहे; परंतु मी सव्वीस वर्षं या तुरुंगातल्या यातना भोगतो आहे आणि आता मी जाणार तरी कुठे? माझी पत्नी मृत्यू पावली आहे. माझी मुलं मला विसरून गेली आहेत. आता मी कुठेही जाऊ शकत नाही!'


माकर पुन्हा पुन्हा विनवणी करीत होता. जमिनीवर डोकं आपटून घेत सारखं म्हणत होता— 'दादा, मला माफ करा, दादा मला माफ करा!'

अक्सिओनोबने त्याच्या पाठीवर प्रेमानं हात फिरवला. अपराधाबद्दल त्याला क्षमा केली. अक्सिओनोबने विचार केला. खरा गुन्हेगार अधिकाऱ्याच्या ताब्यात देऊन आपण जाणार तरी कुठे? त्याची घरी जाण्याची इच्छा केव्हाच मरून गेली होती. आता तुरुंग हेच त्याचं घर होतं. सगळे कैदी म्हणजे त्याचा परिवार होता.

अक्सिओनोबने माकरला खूप समजावून सांगितलं की, आता गुन्हा कबूल करण्यात काही अर्थ नाही. तू गुन्हा कबूल करू नकोस! झालं गेलं विसरून जा!

अक्सिओनोब नको नको म्हणत असताना सुद्धा माकर जेलच्या अधिकाऱ्याच्या समोर उभा राहिला आणि त्यानं आपण केलेला गुन्हा कबूल केला.

जेलच्या अधिकाऱ्यांनी अक्सिओनोबला सोडून देण्याचा निर्णय घेतला; परंतु त्यांचा आदेश येण्याच्या आतच अक्सिओनोबचे प्राण या जगाचे सर्व बंध तोडून निघून गेले होते! जेलमधून मुक्ती मिळाली ती केवळ त्याच्या मृत देहाला! □

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

पुस्तके

# तेजाची आरती

## एकसुरी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक कै. माधव सदाशिवराव गोळवलकर तथा श्री. गुरुजी यांची जीवनगाथा 'तेजाची आरती' या नावाने ग्रंथबद्ध होऊन प्रकाशित झाली आहे.

प्रथमतः एक गोष्ट स्पष्टपणानं जाणवते ती म्हणजे या 'तेजाच्या आरतीचा' गायक अत्यंत सश्रद्ध मनानं, आपला जीव ओतून एका विशिष्ट आवाजात, लयीत गायन करतो आहे. चरित्रनायकाचं अतिशय तल्लीनतेनं नामसंकीर्तन करतो आहे, गुणगान करतो आहे आणि ते करताना तो चरित्रनायकाच्या मूर्त आणि अमूर्त जीवनाशी, कार्याशी समरस झाला आहे, एकरूप झाला आहे. त्यामुळे 'चरित्र आणि आत्मचरित्र' या साहित्यप्रकाराच्या वाङ्मयीन कसोटया लावाव्यात की नाही असा संभ्रम पडतो. लेखकाला हा कसं अस्थानी वाटतो. मला मात्र तसे वाटत नाही. साहित्यकलाकृतीचे मूल्यमापन साहित्याच्या कसोटीवर करावे; मात्र ते सहृदयतेने करावे एवढेच !

### लेखकाचा दृष्टिकोन

लेखकाने आपल्या मनोगतात स्पष्टपणे म्हटले आहे की, या ग्रंथाचे लेखन कोणा एका अज्ञात शक्तीकडून आणि स्वप्नसृष्टीतल्या अनुमतीतून घडले आहे. हें शक्य असावे. कारण या चरित्राच्या पानापानातून आणि शब्दाशब्दातून लेखकाची अपार श्रद्धा, भावुकता ओसंडताना दिसते. तसेच केवळ हे गुरुजींचे जीवन नाही तर ज्या मूल्यांशी, तत्त्वांशी, संघासारख्या ध्येयनिष्ठ, त्यागी संस्थेशी गुरुजी आणि अक्षरशः हजारो त्यांचे स्वयंसेवक एकरूप झाले होते त्या रा. स्व. संघाचेही हे चरित्र आहे आणि म्हणून संघसंस्थापक डॉ. हेडगेवार, गुरुजी आणि संघ, निष्ठावंत कार्यकर्ते यांच्या गुणकर्तृत्वाचे हे गुणगान आहे. ही संघाची गौरवगीता आहे. तिच्या स्मरणाने लेखक पानोपानी स्तिमित होतो, पुलकित होतो. या तेजाच्या आरतीत उजळून निघतो. हा अनुभव इतरांना यावा अशी लेखकाची इच्छा दिसते. वाचकाच्या मनोवृत्तीप्रमाणे ज्याला त्याला अनुभव येईलच !

१९२५ साली नागपूरला डॉ. हेडगेवार यांनी एका उच्च, उदात्त आणि राष्ट्रीय दृष्टीने संघाची स्थापना केली. गेल्या पन्नास वर्षांत संघाने, चालकांनी, स्वयंसेवकांनी जे एका विशिष्ट पद्धतीने, दिशेने अविचल निष्ठा ठेवून त्यागी, सेवाभावी वृत्तीने सतत कार्य केले त्याचा परिणाम भारताच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आता राजकीय जीवनावर घडला आहे. हे तत्त्व सर्वमान्य व्हायला हवे म्हणून भारतीय इतिहासातील विसाव्या शतकात या संघपर्वाला आणि कार्याला योग्य ते स्थान द्यायला हवे. आजवर संघाची वाटचाल तशी खडतर झाली. खळगे, वळणं–आडवळणं, काटेकुटे, आपत्ती, टीकेचे झंझावात आणि अलीकडच्या आणीबाणीचे चटके सहन करीत संघ एखाद्या प्रवाहाप्रमाणं प्रत्यही पुष्ट होत चालला आहे. या संघाच्या आरंभापासूनच्या वाटचालीचा धागा अद्यावत् काळापर्यंत लेखकाने गुंफला आहे. डॉ. हेडगेवार, श्री. गुरुजी, विद्यमान संघचालक बाळासाहेब देवरस आणि असंख्य कार्यकर्ते यांच्या जीवनाच्या कृतीचा आलेख सुबोध आणि ओघवत्या शैलीत रेखाटला आहे म्हणून हा ग्रंथ वाचनीय झाला आहे. ग्रंथाची मांडणी, छपाई, सजावट, छायाचित्रे हे सारे रेखीव आहे.

ग्रंथ वाचून झाल्यावर असे मनात येऊन गेले की, ज्या संघावर श्री. गुरुजींच्या विचारावर, संघकार्यावर जी आजवर घणाघाती टीका होत आहे,–अर्थात् सगळीच टीका दुष्ट आणि क्षुद्र मनोवृत्तीतून होते असे नाही तर अत्यंत प्रेमापोटीही होते; आदरातून होते; त्याचाही साकल्याने परामर्श घेतला असता तर या ग्रंथाचे अनेकांगी महत्त्व वाटले असते. संघ आणि चरित्रनायक हे अष्टपैलू आहेत. त्यांचे सर्वांगांनी, सामग्र्याने, विवेचक दृष्टीने दर्शन घडविले असते तर ही आरती एकसुरी वाटली नसती आणि तेजप्रभा उजळली असती.

*

# गुणसागर टिळक

## उपयुक्त पुस्तक

'गुणसागर टिळक' हें छोटेसे पुस्तक लेखकाने काही विशिष्ट हेतूने लिहिले आहे. युगप्रवर्तक आणि राष्ट्रपुरुष अशा लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या जीवनचरित्रावर प्राथमिक आणि माध्यमिक शालेय स्तरावर मुलांना प्रासंगिक भाषणे करावी लागतात. वक्तृत्वस्पर्धा, स्नेहसंमेलने, टिळकपुण्यतिथी अशा प्रसंगी विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त ठरतील अशी पाच–सात मिनिटांची भाषणे या पुस्तकात तयार करून दिली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. नाही तर शालेय विद्यार्थ्यांना समग्र टिळकग्रंथातून विषय निवडणे कठीण जाते, हा लेखकाचा शिक्षक म्हणून आणि सर्वांचा सर्वसामान्य अनुभव आहे.

या पुस्तकाने विद्यार्थ्यांच्या अंगी वक्तृत्वकला निर्माण व्हावी, समयसूचकता, सभाधीटपणा अंगी बाणावा हा जसा हेतू आहे तसाच लोकमान्यांच्या आयुष्यातील अनेकविध प्रसंगांचे, अंगभूत गुणांचे आणि विविध पैलूंचे दर्शन घडावे आणि संस्कारक्षम वयात त्यांना अभ्यासूवृत्ती, बलसंवर्धन, बहुश्रुतता, गुणग्राहकता, निर्लोभीवृत्ती, निःस्पृहता, कार्यनिष्ठा, त्याग, शुद्ध चारित्र्य, राष्ट्रप्रेम, समाजसेवा, ज्ञानसाधना इत्यादि अनेक लोकोत्तर गुणसंपदेचे संस्कार व्हावेत आणि विद्यार्थ्यांची पिढी कणखर, कसदार व्हावी असाही प्रमुख उद्देश आहे.

त्या दृष्टीने या पुस्तकाची मांडणी, विषय, भाषणे ही उपयुक्त ठरावीत. विद्यार्थ्यांनी या

पुस्तकाचा उपयोग करून घेतल्यास त्यांनाही लाभ होईल आणि लेखकाच्या श्रमाचेही चीज होईल. ❀

**–प्रा. ग. भा. जोशी**

तेजाचो आरती – श्री. गुरुजी एक दर्शन
लेखक : हरि विनायक दात्ये
प्रकाशक : हिंदुस्थान साहित्य, पुणे ३०
किंमत : ३० रुपये; पृष्ठे २६५

गुणसागर टिळक
प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९७७
लेखक : ह. त्र्यं. देसाई
प्रकाशक : पुणे विद्यार्थी गृह, पुणे ३०.
किंमत : ९ रुपये

# आमचे ग्रंथालय

## Your Erroneous Zones

[ About you and your personality ]
By Dr. Wayne W. Dyer
( Sphere Books, Pages 241,
95 Pence )

हे पुस्तक 'सेल्फ-इंप्रुव्हमेंट'च्या प्रकारात मोडणारे आहे. म्हणजे डॅल कार्नेजी, नॉर्मन व्हिन्सेंट पील, नेपोलियन हिल वगैरे लेखकांची पुस्तके आहेत तसे. या क्षेत्रात सर्वांत उत्तुंग शिखरावर पोचलेला ग्रंथ म्हणजे 'हाऊ टु स्टॉप वरिंग अँन्ड स्टार्ट लीव्हिंग !' आतापर्यंत हे पुस्तक आवडीने वाचले जात असे.

कधीकधी अशी शंका येते की, असली पुस्तके वाचून का आपले व्यक्तिमत्त्व सुधारणार आहे ? सर्वांत सोपे काम म्हणजे सल्ला देणे. सर्वांत अवघड म्हणजे सल्ला घेणे. शेवटी 'कळतं पण वळत नाही' हेच खरे का ?

परंतु अधिक खोल विचार केला तर असल्या पुस्तकापासून काही वाचकांना निश्चितच फायदे होतात याची आपल्याला खात्री वाटेल. असल्या पुस्तकापासून फायदे फक्त काही लोकांनाच होतात. कारण इंग्रजीत एक म्हण अशी आहे की, 'यू कॅन टेक द हॉर्स निअर द वॉटर, बट यू कॅनॉट मेक हिम ड्रिंक !' हा पाण्याजवळ जाऊन पाणी न पिणारा प्राणी 'He is a law unto himself' या पंक्तीत बसतो. असल्या लोकांसाठी या पुस्तकाचा मुळीच उपयोग होणार नाही. त्यांना ही पुस्तके आवडणार नाहीत आणि वाचवणारही नाहीत.

पण खरोखरच ज्यांना 'स्वतःला मदत करण्याची' इच्छा आहे त्यांना हे पुस्तक उपयोगी पडेल. 'लोक काय म्हणतील ?' 'आपल्या कुटुंबियांना, आपल्या बॉसला आपल्याविषयी काय वाटत असेल ?' 'आपल्या आयुष्यात व करियरमध्ये आपण सारखे उणे पडतो. आपल्याला 'नाही' म्हणायचे असते तेव्हा नकळत आपल्या तोंडातून 'हो' म्हटले जाते.' काही नवीन योजना तडीस न्यायची असेल तर आपल्यास सारखी अपयशाची धास्ती वाटते. हे सर्व किंवा याच्यातले काही प्रकार बऱ्याच लोकांना होत असतात या सर्वांनाच डॉ. वॅन डायरने 'तुमच्या मनातील चुकीचे प्रदेश' ( Your Erroneous Zones ) म्हटले आहे.

हे पुस्तक एका 'साइकायाट्रिस्ट'नी लिहिले आहे. ते सतत वर्षभर 'टाइम' मासिकाच्या बेस्ट-सेलर यादीत होते.

राग, चिंता, द्वेष, वैफल्य, अपराध, भय या सर्व 'निगेटिव्ह' भावना आहेत. या भावनांपायी किती तरी लोकांचे जीवन बेचिराख झाले आहे. या 'निगेटिव्ह' भावनांच्या जागी 'पॉझिटिव्ह' भावना कशा आणता येतील याचे मार्गदर्शन या पुस्तकात आहे. या निगेटिव्ह भावना किती प्रमाणात शरीरातील रासायनिक क्रियेमुळे उद्भवतात किंवा या भावनेमुळे किती प्रमाणात शारीरिक रासायनक्रियेत बदल होतो हे सांगणे मोठे कठीण आहे.

आता अनावर राग कसा आटोक्यात आणावा हे या पुस्तकातले एक उदाहरण बघू –

□ भूतकाळात आपण सारखे रागावत होतो म्हणून आपण ही सवय मोडू शकणार नाही हे आपल्या मनातून काढून टाका.

राग थोड्या सेकंदांसाठी का होईना थोडा पुढे ढकला. ( पहिले १० सेकंदस् फार महत्त्वाचे आहेत. ) पहिल्यांदा १५ सेकंद पुढे ढकला. दुसऱ्यांदा ३० सेकंद. नंतर तुमच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे उखडा. यापुढे ३० सेकंदांचे १ मिनिट करा म्हणजे हळूहळू तुमच्या रागावर नियंत्रण येईल.

लहान मुलांवर खरोखर रागावू नका. फक्त रागीट दिसा व थोडा आवाज वाढवा म्हणजे मुलं तुमचे ऐकतील. मुलं ही आवाज करणारच. तो त्यांचा गुणधर्म आहे. तुम्ही तो बदलू शकणार नाही. खलिल जिब्रानचे मुलांविषयीचे शब्द या पुस्तकात दिलेले आहेत –

Your Children Are Not
Your Children
They are the sons &
daughters of
Life's longing for itself
They come through you but
not from you.
And though they are
with you.
Yet they belong not
to you.

एखादी गोष्ट तुम्हाला आवडली नाही तर तुम्हाला राग काढावाच लागेल ही कल्पना मनातून काढून टाका. मनात राग न


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**
मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

आणता एखादी गोष्ट तुम्हाला न आवडू द्या.

आपल्याप्रमाणे दुसऱ्यालाही राग येऊ शकतो हे विसरू नका.

कोणत्या प्रसंगी, कधी व का आपल्याला राग आला याची नेटाने नोंद करावयाच्या सवयीमुळे आपण उगाचच राग काढतो असे आपणास हळूहळू आढळेल.

अनावर राग आवरण्याचा आणखी एक उपाय म्हणजे रागवायचा वेळी समोरच्या व्यक्तीचा हात आपल्या हातात घेणे. (कितीही संकोच वाटला तरी–बायकोच्या बाबतीत हे सोपे जाईल म्हणा – नाही तर वांधेच.) हे झाले 'फिजिकल कम्युनिकेशन.'

ज्याच्यावर तुम्ही उखडता त्या व्यक्तीवर राग आला नसेल त्या वेळी राग येण्याबाबत निर्लेप चर्चा करा.

आपल्याविषयी इतरांना काय आवडत नाही त्याची तुम्हाला थोडीशी कल्पना असेलच. अशी अपेक्षा करा की, याबाबतीत मतभेद होणारच आहेत. मतभेद व राग यांच्यामध्ये नेहमी फारकत असू द्या म्हणजे आपण रागाविरुद्ध अर्धे युद्ध जिंकाल.

मनात राग भरून ठेवण्यापेक्षा तो ओकलेला बरा. मान्य; पण त्याहूनही बरे म्हणजे रागाला मनात प्रवेशच नाकारायचा.

दुसऱ्यापासून काही अपेक्षा बाळगू नका.

तुमच्यावर प्रेम करा म्हणजे तो आत्म-विनाशी राग तुम्ही जवळ बाळगणार नाही.

'ट्रॅफिक स्नार्ल'मध्ये कुठे अडकून गेला असाल तर शेजारच्या ड्रायव्हरवर खेकसण्याऐवजी त्याला एखादा नम्र प्रश्न विचारा. एखादे पत्र लिहा. गाणे गुणगुणा किंवा तुमचा एखादा 'सेक्स्युअल एक्स्पीरिअन्स' आठवा! हा उत्तमोत्तम अनुभवही कसा सुधारता येईल याच्यावर विचार करा! (हे डायरनीच लिहिले आहे. मला मात्र या पुस्तकाचे नाव Your Erroeneous Zones च्या ऐवजी सारखे Your Erogeneous zones असेच आठवत होते!)

हे सर्व ठीक आहे; पण सहनशीलतेचा उंबरठा (threshhold of endurance) हा प्रत्येक व्यक्तीत वेगवेगळा असतो. बहुतेक तो genetically impose झालेला असतो; पण प्रयत्नामुळे त्यात थोडाफार फरक जरूर पडेल.

या पुस्तकात थोरामोठ्यांचे उतारे (क्वोटेशन्स) दिलेले आहेत; ते असे –

तुम्हाला स्वतःलाच कोणते लेबल लावू नका असे डायर म्हणतात. एकदा प्रसिद्ध अस्तित्ववादी सॉरन किरकेगार्द म्हणाला होता, "Once you label me, you negate me." एखाद्या व्यक्तीला लेबल लावले की ती व्यक्ती नकळत त्या लेबलावर लिहिल्याप्रमाणे जगू लागते व त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होत नाही.

साम्युअल बटलर एकदा म्हणाला होता, "The man who lets himself be bored is even more contemptible than bore."

परिपूर्ण होण्याच्या मागे आपण धावाल तर आपल्या हातून फारसे काही होणार नाही. परिपूर्णता ही मानवाला कधीच हस्तगत करता येणार नाही, असे डायरला वाटते. (परिपूर्ण होण्याचा प्रयत्न मात्र आपण सतत केला पाहिजे असे मला वाटते) या बाबतीत चर्चिल म्हणाला होता,

"The maxim nothing avails but perfection may be spelled PARALYSIS."

जॉन ड्रायडॅन मत्सराविषयी एकदा म्हणाला होता,

"Jealousy is the jaundice of the soul."

या पुस्तकाच्या शेवटी रीडर्स डायजेस्टमधील एक पॅरा उद्धृत केला आहे. तो पॅरा एक प्रसिद्ध लेखक विल ड्युरांटनी (आता हे फ्रेंच नाव असेल व शेवटचा 'Z' सायलेन्ट असेल तर मला माहीत नाही.) लिहिलेला आहे. विल ड्युरांट यांनी 'द प्लेझर्स ऑफ फिलॉसॉफी' हे पुस्तक लिहिले आहे.

'सुखाच्या मागे लागा. सुख गमविण्याचा हा एक हमखास मार्ग आहे! ज्ञानात सुख गवसते अशा भ्रमात मी होतो; पण पदरी पडला भ्रमनिरास! प्रवासात आनंद मिळतो आहे की ते पाहिले; पण त्यामुळे मी दमलो. आर्थिक संपन्नतेत शाश्वती शोधली, पण चिंताग्रस्त आणि व्याकुळ झालो. माझ्या लिखाणात विरंगुळा मिळतो का, ते पाहिले; पण त्या क्षेत्रातही थकलो. एकदा एका रेल्वेस्टेशनवर 'मिनीकार'मध्ये मी एका स्त्रीला तिच्या अर्भकासोबत कुणाची तरी वाट बघताना पाहिले. थोड्या वेळाने एक माणूस आगगाडीतून उतरला व त्याने त्या बाईचा व त्या अर्भकाचा सौम्यतेने पापा घेतला व ते मोटारीतून निघून गेले. मला एकाएकी कळून चुकले की, "Every normal function of life holds some delight!"

– जे. एन्. पोंडा

– फिनिक्स लायब्ररी


— SOME NEW TITLES RECEIVED —

| | | |
|---|---|---|
| (1) | We Nehrus (Memories) Krishna Hatheesing | 8.00 |
| (2) | The Enemy (Thriller) Desmond Bagley | Rs. 10·00 |
| (3) | The Water of Life (Urine Therapy–Mineral Salts hormones and other vital substances can care any disease) J. W. Armstrong | Rs. 9·60 |
| (4) | Your Erroneous Zones (Self-Improvement) Dr. Wayne W. Dyer | Rs. 15·75 |
| (5) | Elvis : What Happened ? (The inside story of the famous singer who distributed cadillacs like candies) Steve Dunleary | Rs. 17·75 |
| (6) | Hell Is Too Crowded (Thriller) Jack Higgins | Rs. 12·45 |
| (7) | Voices of a Summer Day (Best–seller Novel) Irwin Shaw | Rs. 11·60 |
| (8) | The Minstrel Boy (Best–seller Novel) Anj. Gonin | Rs. 15·75 |

PHOENIX LIBRARY

727, Opp. Sadashiv Post, Poona 30.

# दिल्लीच्या अवती-भवती कामगार असंतोष वाढतो आहे

**निशिकांत भालेराव, नवी दिल्ली**

भारताच्या राजधानीतील औद्योगिक वसाहतीत गेल्या काही दिवसांपासून असंतोष खदखदत आहे. मुंबई, मद्रास, कलकत्ता, अहमदाबाद ह्या प्रमुख शहरांतील औद्योगीकरणापेक्षा दिल्लीचे औद्योगीकरण वेगळे आहे. खरं सांगायचं म्हणजे दिल्लीत कारखाने वगैरे आहेत असे नवख्या माणसाला सांगितले तर ते खरे वाटायचे नाही. ह्याचे साधे सरळ कारण म्हणजे मुंबईप्रमाणे येथील कारखाने व त्यांची धुराडी शहरात दिसत नाहीत. (आमच्या मुंबईत रेल्वेतून तुम्हाला कारखानेच दिसतील. येथील मुंबईकरांची एक प्रतिक्रिया) दिल्ली शहराच्या अनधिकृत समजल्या जाणाऱ्या तीन औद्योगिक वसाहती आहेत. फरिदाबाद, गझीयाबाद आणि सोनीपत. आता ह्या अनधिकृत वसाहती एवढ्याचसाठी म्हणायच्या की, प्रत्येक वसाहत दिल्लीपासून ३०-४० कि. मी. अंतरावर आहे व हे सर्व भाग— हरियाणा व उ. प्र. राज्याच्या अखत्यारीत येतात. म्हणजे खऱ्या अर्थाने औद्योगिक वसाहती ह्या राज्याच्या आहेत; पण दिल्लीकर त्या आपल्याच मानतात. अर्थात हरियाणा व दिल्लीत फरक तरी काय ? एक गमतीची गोष्ट म्हणजे इकडे इंडस्ट्रियल बेल्ट वगैरे न म्हणता कॉम्प्लेक्स (complex) म्हणून तीन्ही वसाहतींना संबोधले जाते. आता ह्या तीन्ही complex मध्ये पुन्हा छोटेछोटे भाग मोहननगर, गुरगाव, बहारपूर, बालग्रह अशा नावांनी ते ओळखले जातात. तीन्ही complex मधील कारखान्यांची वर्गवारी करणे अवघड नाही; परंतु प्रामुख्याने लहान-मध्यम् व काही भागात कापडगिरण्या असे कारखाने आहेत. बहुतांश उद्योगांचे समूह खाजगी मालकीचे आहेत. कामगारांची संख्या एकात लाखावर तर दुसऱ्यामध्ये त्याच्या जवळपास भरेल. अर्थात देशातील इतर भागांप्रमाणेच येथील कामगारवर्ग संघटित आहे. शिवाय राजधानी जवळच असल्याने प्रत्येक कामगाराची राजकीय बांधिलकी अधिक असली तरी ती युनियनच्या राजकीय बांधिलकीशी फारकत घेणारी आहे. म्हणजे असे की, जर कामगार 'सिटू' ह्या संघटनेचा सदस्य असेल तर राजकीय पक्षाविषयी आदराने बोलताना तो जनसंघाला पहिले स्थान देईल; परंतु जनसंघाच्या भारतीय मजदूरसंघाला शिव्या घालील. तर एकूण ह्या complex ची अशी गंमत आहे.

आता ह्या संपूर्ण औद्योगिक वसाहतीवर प्रामुख्याने चार कामगार-संघटनांचे वर्चस्व आहे. मार्क्सवाद्यांची सिटू, कम्युनिस्टांची आयटक, जनसंघाची बीएमएस व संघटना कॉंग्रेसची नॅशनल लेबर ऑर्गनायझेशन अर्थात इंटकवाले आहेत; पण त्यांचा म्हणावा तसा जोर नाही. ह्या सर्वच संघटनांपैकी सिटूच्या कामगार संघटनांचे काही वैशिष्टय आहे. राजकीय पक्षाचे पाठबळ फारसे नसताना सुद्धा सिटूने संपूर्ण परिसरात आपले वर्चस्व आजघडीला निर्माण केले आहे. गेल्या तीन दशकांपासून राजकीय नेते व पक्ष ह्यांचा भरपूर उपयोग करून इंटकने आपली ताकद उभी केली होती; पण संघटनात्मक कौशल्याचा अभाव असणारे जुनाट झालेले कार्यकर्ते व राजकीय पाठिंबा नाहीसा झाल्यावर इंटकला गळती लागली. हिंद मजदूरसंघ (समाजवादी) व राष्ट्रीय मजदूरसंघ (संघ. कॉंग्रेस) ह्यांनी ह्या संधीचा फायदा उठविला नाही. चळवळीला अधिक बांधिलकी मानणाऱ्या 'सिटू'च्या कार्यकर्त्यांनी व दिल्लीला भगवा करण्याच्या नादात असणाऱ्या भारतीय मजदूर संघवाल्यांनी ह्या संधीचा फायदा उठविला. भराभर छोट्या-मोठ्या कारखान्यांसमोर आपले झेंडे फडकाविले आहेत. अर्थात भगव्या झेंड्यापेक्षा लाल रंग जास्त आकर्षक व धुंद करणारा असल्याने सिटूला भक्कम पाठिंबा ह्या भागात आहे.

ही सर्व पार्श्वभूमी सांगण्याची आवश्यकता एवढ्याचसाठी आहे की, मुंबई-पुण्यातील औद्योगिक तंट्यापेक्षा येथील तंटे हे दोन संघटनांतील वैमनस्य व भाडोत्री गुंडांच्या मदतीने मालकवर्ग कामगारांवरील दडपण व त्यातून निर्माण होणारी हिंसक व विध्वंसक प्रवृत्ती, अशा स्वरूपाचे आहेत.

तर गेल्या ५-६ महिन्यांपासून दिल्लीतील औद्योगिक complex हा अगदी बिकट प्रश्न होऊन बसला आहे. टाळेबंदी, नोकरकपात व संप हे जरी नित्य नेमाने चालू असले तरी २० जणांचे मुडदे, २ कंपन्यांची राख व ३ सुरक्षा सैनिकांचे निर्घृण खून घडत असल्याने एक नवीन पेच निर्माण होत आहे. मुंबई-पुण्याच्या औद्योगिक तंट्यापेक्षा दिल्लीवाल्यांचे हे हिंस्त्र वैशिष्टय म्हणावे लागेल. अर्थात ह्या असंतोषाला प्रामुख्याने मालकवर्गाची भांडवलदारी व जुलमी मनोवृत्ती जबाबदार आहे. दिल्लीतील समस्त वृत्तपत्रांनी वेळोवेळी उद्भवणाऱ्या ह्या घटनांचे निःपक्षपाती वृत्तांत दिलेले आहेत आणि अर्थातच ते मालकवर्गाची मनोवृत्ती उघड करणारे आहेत.

ह्या ठिकाणी एकंदर माहिती सांगण्याचे काम ह्या लेखाचे आहे असे माझे मत आहे. प्रत्यक्ष घटनास्थळी व कामगारांशी बातचीत करून ही माहिती मिळाली आहे. ह्यातून असे जाणवले की, मालकवर्गांनी कामगारांना जेरीस आणण्याचे जे 'नवे तंत्र' योजिले आहे ते एकंदरच औद्योगीकरणास जसे घातक आहे तसेच कामगार-चळवळीला सुद्धा मूळ उद्देशापासून विचलित करणारे आहे.

गझीयाबाद येथे काही महिन्यांपूर्वी एक भयानक घटना घडली. जिचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. गझीयाबाद औद्योगिक वसाहत ही उत्तर प्रदेश सरकारच्या अखत्यारीत आहे. ह्याच

वसाहतीमधील मोहननगरमध्ये सप्टेंबर ७७ मध्ये मालक सुरक्षा सैनिक-कामगार अशी लढाई (शब्दार्थाने) होऊन ७० कामगार जखमी झाले तर २ सुरक्षा सैनिकांना प्रक्षुब्ध जमावाने अक्षरशः ठार मारलें आणि अर्थातच करोडो रुपयांच्या कारखान्याला आग लावण्यात आली. ह्या सर्व प्रकरणाचे बारकावे पाहणे उद्बोधक आहे. हॅरिक इंडिया नावाचा एक खाजगी उद्योगसमूह मोहननगरमध्ये आहे. १ हजार कामगार येथे आहेत. गेल्या १६ वर्षांत कारखान्यात तंटा झालेला नाही. निर्यातीबद्दल राष्ट्रपतिपदक कंपनीने मिळविले आहे. हॅरिक इंडियामध्ये सिटू ह्या मार्क्सवाद्यांच्या संघटनेचा जोर आहे. काही दिवसांपूर्वी सिटूने मालकवर्गाला एक मागणीपत्र दिले होते, जे मालकांनी फेकून दिले. त्यानंतर एकदम अनधिकृत संप झाला. पुढे मालकांनी अमुक तारखेला निर्णय देण्याचे मान्य केले. सप्टेंबरला निर्णय लागणार होता. ७ सप्टेंबरला सकाळी कारखान्यातील शंभर कामगारांनी गेटजवळ निदर्शने केली. त्या वेळी वातावरण थंड होते. त्या वेळीच कंपनीच्या जवळपास १६ सुरक्षा सैनिकांनी कामगारांची खोड काढली. ह्यातून थोडा तणाव निर्माण झाला. ह्याच दरम्यान मालकांनी कामगारांवर दहशत निर्माण करण्यासाठी शाहदराहून (दिल्लीतील एक भाग) जे ३-४ 'दादा' आणले होते त्यांनी हस्तक्षेप करून कामगारांना गप्प बसविण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती चिघळली. कामगारांची संख्या वाढली व ते कंपनीच्या आत घुसू लागले. काही कामगारांनी हातात सळया, दंडुके, दगड घेऊन सुरक्षा सैनिकांवर फेकण्यास सुरुवात केली. आता आपली धडगत नाही हे लक्षात घेऊन समस्त सुरक्षा सैनिक आपली शस्त्रास्त्रे सज्ज ठेवून छतावर जाऊन बसले. वर सैनिक तर खाली प्रक्षुब्ध झालेला कामगारवर्ग! पुढे काय होतंय हे कळायच्या आत एका सैनिकाने मालमत्तेची हानी टाळण्यासाठी व स्वसंरक्षणार्थ आपली बंदूक उघडली व दंगल सुरू झाली. छतावरून सर्रास गोळ्यांचा मारा खालील कामगारांवर सुरू झाला. आता कामगार हिंसक झालेले होतेच. काही जणांनी दोन सैनिकांना खाली खेचले व ठोकण्यास सुरुवात केली. दरम्यान कंपनीला आगसुद्धा लागली. ३-४ कोटींची मालमत्ता जळली, दोन सुरक्षा सैनिक ठार, अनेक कामगार जखमी झाले. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. १४० कारखान्यांच्या मोहननगरमधील समस्त कामगारबंधू प्रक्षुब्ध होऊन हॅरिक इंडियावर चाल करून आले. सर्वत्र तणाव निर्माण झाला. पोलिसांना पाचारण करण्यात आले; पण तोपर्यंत उशीर झालेला होता.

ह्या सर्व घटनेतील कामगारांची बाजू अशी की, मालकांनी आणलेले गुंड हे 'मुद्दाम हिंसा' घडवून आणण्यासाठीच आणले होते. त्यांनी आदल्या रात्री सुरक्षा सैनिकांना काडतुसे व इतर सामुग्री पोहचविली. कामगारांच्या ह्या आरोपास पुष्टी मिळाली ती पोलिसांनी सैनिकांच्या घेतलेल्या झडतीमुळे. ज्या वेळेस झडती झाली तेव्हा १२ बोअरच्या ४ बंदुका, १० गावठी पिस्तुले, काही बुलेटस् पोलिसांनी हस्तगत केल्या. ह्या जरुरीपेक्षा जास्त होत्या. ह्यावर कंपनीच्या मालकांची बाजू अशी की, ४-५ दिवसांपासून कामगार काही तरी कारण काढून काम बंद करीत होते. कंपनीच्या एका अधिकाऱ्याला मारण्याची धमकी कामगारांनी दिली होतीच; शिवाय कंपनी जाळण्याची सुद्धा! पोलिसांचे म्हणणे असे की, कंपनीला आग कोणी लावली हे सांगणे कठीण. आम्ही (पोलिसांनी) केलेल्या गोळीबारात सुरक्षा सैनिक ठार झालेत हा कामगारांनी केलेला आरोप व पोस्टमार्टेमने दिलेला रिपोर्ट निखालस खोटे आहेत. तर मालक मंडळीचे पुन्हा ह्यावर म्हणणे असे की, कामगारांनी आपल्या हातातील दंड्यावर कापडाचे पलिते पेटवून मालमत्ता जाळायला सुरुवात केली, छतावरील सुरक्षा सैनिकांना ह्याच कामगारांनी मरेपर्यंत ठोकून काढले.

आता ह्या आरोप-प्रत्यारोपांच्या भानगडीत नेमके काय झाले हे समजणे अवघड असले तरी मालकांनी गुंड आणि सुरक्षा सैनिकांमार्फत कामगारसंघटनेला चिरडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच हा प्रक्षोभ निर्माण झाला. ह्या प्रकारानंतर सिटूवाल्यांनी जी जबरदस्त निदर्शने (लाल झेंडे, काठ्या, सळया घेऊन) केली ती बेभान असली तरी निश्चितच समर्थनीय होती.

ही झाली असंतोषाची एक ठिणगी. ह्या घटनेनंतर सरळ-सरळ संपूर्ण औद्योगिक वसाहतीमध्ये मालक, सुरक्षा सैनिक, अधिक दादामंडळी एका बाजूला, तर न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या कामगारसंघटनांची शक्ती एका बाजूला. हा लढा उघडपणे उग्र रूप धारण करायला लागला आहे. कामगारतंट्याबाबत नेहमीच सहानुभूति (अर्थातच कोरडी) लोकशाहीचे पुरस्कर्ते दाखवीत असतात; पण दिल्लीच्या indistrial complex मधील भांडवलदारवर्गाचे वर्चस्व वाढत असताना हे लोकशाही प्रेमी कुठे झोपा काढतात? ह्या येथील सामान्य कामगारांच्या प्रश्नाला उत्तर देणे अवघड आहे.

कामगारतंट्याबाबतची अजून एक नुकतीच भयानक घटना सांगण्यापूर्वी दिल्ली औद्योगिक क्षेत्राविषयीची काही माहिती सांगणे मला आवश्यक वाटते. त्यामुळे एकंदर दोन वर्गांतील तंटे वाढले तर एकूणच देशाच्या औद्योगीकरणावर काय परिणाम होईल ह्याचा अंदाज व काळजी प्रत्येकाने करीत बसावे. दिल्लीमध्ये ३६००० औद्योगिक युनिटस् आहेत. ह्या सर्वांमध्ये ४०६० लाखांचे उत्पन्न काढले जाते. ह्या क्षेत्रामध्ये २८१००० कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे आणि प्रामुख्याने हे कामगार विद्युतउपकरणे, लेथमशिन कॉपर, रबर व कापड-उद्योगधंद्यात कामाला आहेत. कामगारसंघटनेविषयी सांगायचे झाल्यास एकूण ११७५ कामगारसंघटना अधिकृत आहेत. ह्यात प्रामुख्याने सिटू व भारतीय मजदूर संघाचे वर्चस्व आहे. ७४ मध्ये एकूण ३० औद्योगिक तंटे न्यायालयात प्रविष्ट होते. ज्यामध्ये १४०७९ कामगारांचा खोळंबा झालेला आहे आणि ह्या तंट्यापायी औद्योगिक क्षेत्रात १९२०६२ श्रमदिवसांचे नुकसान झालेले आहे.

ह्या गोष्टीवरून साधी गोष्ट अशी की, देशातील इतर औद्योगिक क्षेत्राप्रमाणेच दिल्लीची स्थिती आहे.

आजघडीला गजीयाबाद-सोनीपेठ-फरिदाबाद ही तीन क्षेत्रे प्रचंड तणावाखाली आहेत. परवाच फरिदाबाद ह्या दिल्लीहून ३० कि. मी. अंतरावरील औद्योगिक क्षेत्रात पुन्हा एक घटना घडली, ज्यामुळे असंतोषाचा वणवा पुन्हा पेटलाय.

**दिनांक १६ फेब्रु.**

सकाळीच जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी 'कामगारांची लोकसभा' नावाची नवीन थिअरी मांडल्याचे वाचले. खूपच थ्रीलिंग वाटले. त्यांच्या ह्या बातमीच्या बाजूलाच 'फरिदाबाद येथे गोळीबार. २ ठार १० जखमी' अशी बातमी होती. एकूण भयानक प्रकार घडल्याचे वाचल्यावर जाणवलेच. फरिदाबादला ताबडतोब निघालो. दर एक घंटयाच्या अंतराने दिल्लीहून फरिदाबादला बसेस जातात. बसने दीड तासात पोहचता येते. दिल्लीहून खाली जाणाऱ्या कोणत्याही रेल्वेगाडीत फरिदाबादवाल्यांची गर्दी आढळून येईल. तर फरिदाबादला पोहचलो. अव्यवस्थितपणा व नियोजनाचा अभाव बऱ्याच कारखान्यांच्या वास्तू पाहून जाणवत होता. बसमध्ये एकाला ॲटो पिन्स ( इंडिया ) लि. ह्या कारखान्याचा पत्ता विचारला तेव्हा त्याने कालच्या घटनेचा संदर्भ देत पत्ता सांगितला.

बसमधून खाली न्यू इंडस्ट्रियल टाउनशिप ह्या भागात उतरताच कामगारांचे टोळके बसलेले आढळले. समोरच एका इमारतीच्या समोर सशस्त्र पोलिसांची तुकडी दिसल्यावर इथेच घटना घडली असल्याची शंका बरोबर ठरली. ट्रॅक्टरचे भाग, लीफस्प्रिंग तयार करणाऱ्या व वर्षाला ४० लाखांचे उत्पन्न गाठणाऱ्या 'ॲटोपिन्स' लि. ची इमारत समोरच दिसली. गेटच्या बाहेरच ३ मोटर सायकली, २ स्कूटर व १ गाडी अर्धवट जळाल्याच्या अवस्थेत रस्त्यावर पार्क होऊन पडलेल्या दिसल्या. पोलिसांच्या उपस्थितीमुळे उगाचच भयानकता जाणवत होती.

आता नेमके काय कसे झाले हे समजणे अवघड होते. बऱ्याच कामगारांना, आजूबाजूच्या लोकांना माहिती विचारली तेव्हा सारा प्रकार ध्यानात आला. मागच्या वर्षी इंटक संघटनेने मालकांशी एक करार केला. मध्यंतरी इंटकचा बोऱ्या वाजला व ५०% अधिक कामगारांनी 'सीटू'मध्ये प्रवेश केला. सीटूवाल्यांनी एक नवीन मागणीपत्रक मालकांना दिले, ज्यात १९७३ मध्ये मान्य केलेल्या इंजिनियरिंग वेजबोर्डाने सुचविलेल्या सूचना मान्य करा अशी मागणी सुद्धा होती. मालकांनी अर्थातच एक वर्षाचा करार आम्ही केलेला आहे ह्या सबबीखाली 'सीटू'ला धुडकावून लावले. लगेच कामगारांनी उपोषण सुरू केले. संप सुरू झाला. कामगारांनी कारखान्यात जाऊ नये म्हणून अर्थातच प्रयत्न झाले. कामगारांनी गेट मीटिंग लावली. मालकांनी मनाई केली. १५ तारखेला संध्याकाळी तणाव वाढला व सुरक्षा सैनिक व कामगार ह्यांच्यात विटांची मारामारी झाली आणि तेवढयात मोटर, स्कूटर वगैरेंची राख झाली. प्रत्यक्ष घटना बघणाऱ्या एका कामगाराने सांगितले की, 'कालच ह्या कंपनीच्या आत विटा-दगड साठविण्यात आले होते व सुरक्षा सैनिकांनी कामगारांना जेव्हा बाहेर हाकलण्यास सुरवात केली तेव्हाच विटांचा मारा झाला!' सुरक्षा सैनिकांना शस्त्र चालवण्यास फारसा वेळ मिळाला नाही. त्यामुळे कामगारांचा त्यांना मार खावा लागला. ह्या प्रकारानंतर अर्थातच पोलीस आले व त्यांनी १४० कामगारांना पकडून नेले. त्यानंतर लगेच आजूबाजूच्या कारखान्यात क्षणिक काम बंद झाले. सध्या कारखाना बंदच आहे. खरे तर घडलेली हकीगत एवढीच सरळ आहे.

आता ह्या घटनेच्या राजकारणात जेव्हा शिरण्याचा प्रयत्न केला तेव्हा पुन्हा मालकवर्ग+गुंडागर्दी विरुद्ध हतबल कामगार ही तेढ दिसून आली; पण ह्यात कामगारांचे म्हणणे रास्त असल्याचे पोलिसांच्या अहवालानुसार सिद्ध झाले आहे. सदर कारखान्यात संघटना बांधण्याचा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा मालकांनी अडचणी निर्माण केल्या. संप व संघटना मोडून काढण्यासाठी दहशत निर्माण करण्याचे तंत्र योजले. १५ दिवसांपूर्वीच मालकांनी २० सुरक्षा सैनिकांना नव्याने नेमले होते आणि ही नेमणूक संशयास्पद असल्याची जाणीव कामगारांना २-३ दिवसांत झाली. अलवार जिल्ह्यातील ह्यातील बहुसंख्य सुरक्षा सैनिक होते आणि त्यांचा 'पूर्वाश्रमीचा इतिहास' पाहूनच मालकांनी त्यांना नेमले हे कामगारांचे म्हणणे. ह्या तथाकथित सुरक्षा सैनिकांच्यापैकी ४ सैनिक हे प्रसिद्ध गुंड म्हणून ओळखले जातात. आता हे सर्व माहीत असूनही मालकांनी कामगारांवर दडपण आणण्यासाठी सैनिकांचा उपयोग करून घेतला ही वस्तुस्थिती पोलिस-अधिकाऱ्यांनीसुद्धा मान्य केली. फरिदाबाद विभागाचे डीएसपी श्री. जयसिंग ह्यांचे म्हणणे ह्याबाबत लक्षात घेण्यासारखे आहे. डीएसपींचे उत्तर असे की, ४ सुरक्षा सैनिकांचा इतिहास चांगला नाही व त्यांचे चारित्र्य shady आहे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे चारही जण एकाच समाजातील आहेत आणि कामगारांनी ह्यांच्या विरुद्ध तक्रार मालकवर्गाकडे केली होती; परंतु त्यांनी दखल घेतली नाही. उलटपक्षी आम्ही (पोलीस) तुम्हाला पाहिजे ते संरक्षण देण्यास तयार आहोत असे मालकवर्गाला सांगूनही त्यांनी आमची मदत फेटाळून लावली आणि ह्या तथाकथित सुरक्षा सैनिकांच्या वागण्यामुळे कामगारांत संताप निर्माण होणे हे म्हणूनच स्वाभाविक आहे आणि ह्या गुंडांचा उपयोग मालकांनी कामगारांवर दहशत निर्माण करण्याच्या उद्देशानेच केला होता हे उघड आहे.

आता पोलिसांच्या ह्या अहवालानंतर मालकवर्गाचे म्हणणे ऐकणे मजेशीर होते. मी जेव्हा कंपनीच्या वास्तूत जायचा प्रयत्न केला तेव्हा अर्थातच हटकण्यात आले. त्याच वेळेस कंपनीचे एक अधिकारी बाहेर आले आणि विश्वास बसणार नाही; पण त्यांच्याजवळ चक्क एक छोटेखानी रिव्हॉल्वर होते. म्हणजे एवढे नाटक झाल्यावरसुद्धा त्यांना कामगार आपल्यावर हल्ला करतील अशी भीती वाटत होती. संबंधित ॲटोपिन्स कंपनीचे संचालक श्री. अवतारसिंग ह्यांचे रिव्हॉल्वर जवळ बाळगण्याचे समर्थन असे की, दोन दिवसांपूर्वीच माझ्या गाडीवर दगडफेक झाली. ज्या कामगारांना कामावर येण्याची इच्छा आहे त्यांना सुद्धा संपावर असलेले कामगार येऊ देत नव्हते. ह्या सर्वच गोष्टींमुळे मला नाइलाजाने हे शस्त्र जवळ बाळगावे लागत आहे. मला साहेबांच्या उत्तराची कमाल वाटली. शांतपणे धरणे धरून बसलेले ५०-६० कामगार माझ्या नजरेसमोर आले.

गेटच्या बाहेर पोलिसांचा कडक पहारा होताच. कामगारसुद्धा होते. कामगारांची बाजू जाणून घेण्याची इच्छा होतीच. कामगारांनी पार्श्वभूमी सांगण्यास सुरवात केली. ॲटो पिन्स ह्याच कंपनीची एक जुळी कंपनी सिरोक्को ॲटो लिमिटेड नावाची बाजूलाच आहे. ह्या कारखान्यात काही कामगारांना अचानक काढून टाकण्यात आले. ह्याविरुद्ध युनियननी आंदोलन सुरू केले. तेवढयात एका कामगाराने फाटकावर लावलेली नोटीस दाखविली, ज्यात संप बेकायदेशीर असून ज्या ११४ कामगारांनी त्यात भाग घेतला त्यांची

नावे लिहिलेली होती. त्याचप्रमाणे दुसऱ्या एका नोटिसीद्वारे समस्त कामगारांना एक आवाहन करण्यात आले होते की, त्यांनी एक निवेदन सही करून द्यावे, ज्यात आम्हाला जबरदस्तीने संपावर जाणे भाग पाडले असे लिहिलेले असेल. शिवाय आम्ही ह्यापुढे युनियनच्या कार्यक्रमात दिलचस्पी घेणार नाही अशी शपथ घ्यायची. आता ह्या नोटिसा फारच बोलक्या वाटल्या. लढाऊ कामगारांनी ह्या नोटिसांना टॉप स्टाइल लि. व हेन लेहमान हे दोन औद्योगिक युनिटस् बंद पाडून चोख उत्तर दिले. एका कामगाराने माहिती दिली, की संप सुरू झाला त्याच दिवशी 'आयटक्'चे कार्यकर्ते विजय पालिया ह्यांच्यावर एका अधिकाऱ्याने गुंडांच्या सहाय्याने प्राणघातक हल्ला केला.आज घडीला तीन्ही युनिटस्मधले काम थंडावले आहे. मालक अधिक सुरक्षा सैनिकांच्या दहशतीला सीटू व आयटक ह्यांनी एक जबरदस्त रॅली आयोजित करून उत्तर दिले हे खरे; पण आता प्रश्न कामगारांची बाजू योग्य असूनही बिकट होऊन बसलाय.

आता दिल्ली औद्योगिक क्षेत्रातील त्या दोन घटनांतील प्रमुख कारण अर्थातच मार्क्सवाद्यांच्या तत्त्वानुसार श्रमाची पिळवणूक करणाऱ्या भांडवलदारवर्गाविरुद्ध सर्वहारा श्रमिकवर्ग हेच आहे. ते जरी खरे असले तरी संपूर्ण औद्योगिक क्षेत्रात भारतीय मजदूरसंघ सीटू व आयटक ह्या संघटनांमधील 'ह्राडवैर'सुद्धा एक कारण आहे. आता ह्या दोन्ही संकटग्रस्त कारखान्यांतल्या गेटवर सीटू व आयटकचे लाल बावटे होते, तर इंटकचा तिरंगा व त्याच्या बाजूलाच भगवासुद्धा रोवलेला होता. मात्र या हिंसक प्रसंगानंतर दुसऱ्या दिवशी भगवा व तिरंगा नाहीसा झाला. भारतीय मजदूर संघवाल्यांचे म्हणणे असे की, आम्ही संघटना बांधण्याचा प्रयत्न केला होता; पण कामगारांनी प्रतिसाद दिला नाही म्हणून आम्ही माघार घेतली आणि ह्यामुळे बीएमएसवाल्यांची तारीफ मालकवर्ग करतो असे एका कामगाराने सांगितले. आता हीच लय धरून सीटूच्या एका नेत्याने सांगितले : राज्यसरकार (म्हणजेच हरियाणा व उ. प्र.) च्या 'स्थानिक नेत्यांना' व अधिकाऱ्यांना असे आदेश दिलेले आहेत की, उजव्या प्रतिक्रियावाद्यांच्या कामगार संघटनांची वाढ झाली पाहिजे आणि ही क्रिया हरियाणाच्या कामगारमंत्री श्रीमती सुषमा स्वराज ह्यांना काढून टाकल्यानंतर लगेच घडून यायला लागली आहे. हरियाणा मंत्रिमंडळातील दोन मंत्री उजव्या कामगार संघटनांचे वर्चस्व वाढावे म्हणून जोरदार प्रयत्न करीत आहेत. श्रीमती स्वराज ह्यांनी स्थापन केलेली ट्रीपार्टी कन्सिलिएशन कमिटी ही सुद्धा बरखास्त झाल्यानंतर डाव्या व उजव्या कामगार संघटनांतील वैमनस्य अधिकच स्पष्ट झालंय. आता श्रीमती स्वराज पुन्हा मंत्रिमंडळात आल्या तरी त्यांच्या कामगार-धोरणावर 'काही दबाव' आणले जातात असे कामगारनेत्यांत बोलले जाते.

आज घडीला सीटूनी आपली ताकद प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या केडरमुळे वाढविली असली तरी जनता पक्षातील एका घटक पक्षाची कामगार संघटना म्हणून भारतीय मजदूर संघाला मालकवर्गाकडून प्रोत्साहन दिले जात आहे आणि बीएचएसवाल्यांचे सुदैवाने त्यांचेच एक मंत्री श्री. मंगल सेन आज घडीला गृह व उद्योग मंत्रालय पहात आहेत. हे जरी खरे असले तरी संपूर्ण उद्योगक्षेत्रात सीटूची लोकप्रियता वाढत आहे. बऱ्याच कारखानदारांनी बोनसचा दर वाढविला आहेच. शिवाय आता प्रत्येक संपातील एक मागणी घरभत्ता व वाहनभत्ता दिलाच पाहिजे अशी हमखास असते; पण हे जरी खरे असले तरी इंजिनियरिंग वेजबोर्डने केलेल्या शिफारशी कोणीच अमलात आणीत नाहीत असे मात्र तीन्ही कामगार संघटनांचे मत आहे.

ह्या संपूर्ण औद्योगिक क्षेत्रात फिरताना कामगार-अशांतेशिवाय अजून एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे एवढे कामगार कल्याण कायदे झालेत पण सुरक्षिततेच्या व आरोग्यविषयक नियमांचे पालन मात्र कोणी करीत नाहीच. एकीकडे संघटित कामगारांविरुद्ध ओरड करायची व त्यांच्या कल्याणार्थ आवश्यक असलेल्या basic *aminities* मात्र विसरून जायच्या. हे किती दिवस चालणार? आता ह्या गोष्टींवरून एक शंका मनात येऊन गेली. काही महिन्यांपूर्वी दिल्लीत समस्त कामगार संघटनांची परिषद झाली होती. त्यात बराच उत्साह लाल व भगव्या मंडळींनी दाखविला होता. (अर्थात ह्यात समाजवादी पुढे होतेच.) सत्तेच्या राजकारणासाठी डावे-उजवे एकत्र येऊन सरकार रेटत असले तरी कामगार संघटनांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया ही अवघड तर आहेच पण चळवळीची हानी करणारी ठरेल म्हणून डावी मंडळी आता मूग गिळून गप्प तर बसली नाही ना? □

---

## अवती-भवती : पृष्ठ ३ वरून

नंतर बाईंनी प्रथमच पत्रकारपरिषद घेतली. जनता पक्ष आणि जनता सरकार यासंबंधी त्यांची भाषा आश्चर्य वाटण्याइतकी मवाळ असली तरी रेड्डी-चव्हाण काँग्रेसबाबत-विशेषतः या दोन्ही नेत्यांबाबत त्यांनी भरपूर बोचरी टीकाटिप्पणी केली. आमच्या मुख्य काँग्रेसपासून फुटून निघालेल्या गटाने जो पराक्रम केला त्यामुळे आमची काँग्रेस हीच खरी काँग्रेस असल्याचे सिद्ध झाले आहे, असे सांगून त्या म्हणाल्या, 'या कौटुंबिक झगड्यामधील न्याय्य बाजू समोर आल्याने आता जर कोणाला आमच्याबरोबर यायचे असेल तर त्यांना आम्ही अवश्य बरोबर घेऊ; परंतु आता त्यांच्या अटीतटी चालणार नाहीत! माझ्या इच्छा प्रमाण मानून त्यांना यावे लागेल!' नेतृत्वाच्या प्रश्नाबाबत आता कोणाच्या मनात गोंधळ राहू नये. इंदिरा काँग्रेस ही खरोखरच इंदिरा काँग्रेस राहील असे मत त्यांनी पुरेशा स्पष्ट शब्दांत व्यक्त केले. अजूनही नेतृत्वाबाबत कोणाला शंका असतील तर थांबण्याची आणि येणारे आव्हान झेलण्याची त्यांची तयारी दिसते; परंतु आता सामुदायिक नेतृत्वाच्या गप्पांना भीक घालण्याच्या मनस्थितीमध्ये त्या दिसत नाहीत. दक्षिणेमध्ये इंदिरा काँग्रेसने जी मते घेतली त्यामुळे काँग्रेसचा परंपरागत मतदार इंदिरा काँग्रेस खरी असल्याचे मानतो, हे वादातीतपणे सिद्ध झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले तरी जनता पक्षाच्या उत्तरेतील असाधारण वर्चस्वाची त्यांना चांगलीच जाणीव दिसली. लोकसभेमध्ये प्रवेश करण्याची आपली इच्छा नाही हे त्यांचे मत, उत्तरेतून निवडणूक लढविणे कठीण आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असल्याचे सूचित करते. दक्षिणेमधील एखाद्या सुरक्षित मतदारसंघातून त्या सहज निवडून येऊ शकतील; परंतु दक्षिणेतून लोकसभेमध्ये येणे त्या पसंत करणार नाहीत. एक तर त्यांनी दक्षिणेतून निवडणूक लढविणे याचा अर्थच त्यांनी उत्तरेमधील जनता पक्षाचे वर्चस्व मान्य करून स्वतःचा पराभव कबूल करणे आणि दुसरे म्हणजे राष्ट्रीय नेता म्हणून त्यांची जी प्रतिमा आहे, त्याला छेद देणारे आहे. त्यांच्या सध्याच्या वक्तव्यावरून देशभर जनता पक्षाविरुद्ध वातावरण तापविणे हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट दिसते. जनतेच्या मनामध्ये

असलेल्या रागाला दिशा प्राप्त करून देणे हे आपले मुख्य काम असल्याचे त्या सांगतात. अकरा वर्षे खेळलेला पंतप्रधानकीचा खेळ पुन्हा खेळण्याची इच्छा नाही असे त्या म्हणत असल्या आणि तोंडाने जनआंदोलनाची भाषा करीत देशभर संचार करीत असल्या तरी दिल्लीची सत्ता पुन्हा जिंकून घेणे हेच त्यांचे एकमेव आणि अंतिम उद्दिष्ट आहे! स्वतःच्या मनाविरुद्ध त्या रेड्डी-चव्हाण काँग्रेसबरोबर तडजोड करतात त्याचे कारण आंध्र-कर्नाटकमधील एकछत्री अंमलाला लागून महाराष्ट्रामधील अर्धीमुर्धी सत्ता का होईना, संपादन करणे आज त्यांना अत्यंत सोइस्कर आहे–आवश्यक आहे. इंदिराजींनी केवळ आपणच विरोधी पक्षाची नेता असल्याचा दावा केला असता. 'आपण लोकसभेमध्ये किंवा राज्यसभेमध्ये का जात नाही?' असा प्रश्न त्यांना विचारला गेला. त्या ताडकन् म्हणाल्या, 'आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टीचे प्रतिबिंब लोकसभेमध्ये उमटत नाही.' आपला केवळ दक्षिणेमध्ये विजय झाला हा विचार इंदिराजींना मंजूर नाही. त्या म्हणतात, 'उत्तरेतही मला हळूहळू पाठिंबा मिळत आहे.' 'आपण हे कशाच्या आधारावर म्हणता?' असा प्रश्न आला मात्र...लगेच उत्तर आले, 'हे पहा, मला कान आहेत, डोळे आहेत. बिहार, राजस्थान, मध्यप्रदेश या ठिकाणी मी फिरले आहे. लोकांना माझी भूमिका पटते आहे असे दिसते.' जनतेच्या रागाला नेमका कसा आकार देणार याबाबत बोलताना त्या म्हणाल्या, 'निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना राजिनामे द्यायला मी नक्कीच सांगणार नाही!' □

## □ राज्यसभेचे बदलते चित्र

आंध्र, आसाम, महाराष्ट्र, कर्नाटक आदी ठिकाणी झालेल्या विधानसभा-निवडणुकांचा केंद्र सरकारवर प्रत्यक्ष परिणाम होणार नसला तरी राज्यसभेच्या येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये या विधानसभा-निवडणुकांचे प्रतिबिंब उमटणार आहे. याच महिन्याच्या अखेरीस राज्यसभेमधील ७५ सदस्य निवृत्त होत असून नवीन सभासद त्यांची जागा घेणार आहेत. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांतून एकूण सतरा नवीन सभासद येणार आहेत. या येणाऱ्या मंडळींमध्ये अर्थातच इंदिरावादी बरेच असणार. खेरीज अन्य ठिकाणांहूनही एखाद-दुसरा इंदिरावादी येण्याची शक्यता आहेच. तात्पर्य संसदीय व्यासपीठावर इंदिराजींचा आवाज मोठा होणार आहे. इंदिराजींनी चरणसिंग यांनी लोकसभेमध्ये केलेल्या एका विधानाच्या संदर्भात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली होती. लोकसभेने ते प्रकरण हक्कभंगसमितीकडे दिले होते. या समितीने बाईंना दोषी ठरविले तरी त्यांच्यावर कोणतीही कारवाई करू नये, असे मत व्यक्त केले होते. हा अहवालही एकमुखी नव्हता. समितीवरील हितेंद्र देसाई, ओ. व्ही. अलगसेन आणि अन्य दोन काँग्रेस सदस्य यांनी आपले विरोधी मत नोंदले होते. वास्तविक हे प्रकरण एवढ्यावर मिटले असते तर बरे झाले असते; परंतु बाईंना गृहासमोर हजर करून ताकीद द्यावी अशा हालचाली सुरू झाल्या आणि अखेरीस स्वतः मोरारजीभाईंनी हस्तक्षेप करून हे प्रकरण एकदाचे मिटविले. इंदिराजींबद्दलची प्रत्येक गोष्ट आता काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. घेतलेल्या निर्णयाचे राजकीय परिणाम काय होतील हे तपासून पाहणे आवश्यक झाले आहे. राज्यसभेमध्ये इंदिरा काँग्रेसची ताकद जशी वाढणार आहे, तशीच ती लोकसभेतही वाढणार आहे. लोकसभेमध्ये इंदिरा काँग्रेसचे नेतृत्व करणारे स्टिफन ५४ सदस्य आपल्याबरोबर असल्याचा दावा करतात. ही संख्या वाढवीत नेऊन चव्हाणांना शह देण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न येत्या काही दिवसांत होतील. बाईंचा स्वभाव ज्यांना माहीत आहे त्यांना दक्षिणविजयातून मिळालेले सारे सामर्थ्य एकवटून बाई पहिला हल्ला चव्हाणांवर करतील हे सांगण्याचे कारण नाही. एस्. एम्. चव्हाणांना सहकार्याचे आवाहन करतात आणि नानाजी मुंबईत येऊन चव्हाणांची तारीफ करतात, यामागे ही पार्श्वभूमी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कोंडीत पकडले गेलेले चव्हाण, दोन काँग्रेसच्या एकीकरणाच्या वाटाघाटीत पुष्कळच दुर्लक्षिले गेले. वाटाघाटींचा तपशील ठरवून नंतर माहितीसाठी तो साहेबांच्या कानी घालण्यात आला. बाईबरोबरचा सहवास चव्हाणांना आता मानवण्यासारखा नाही. जी काँग्रेस उभारायचा त्यांनी प्रयत्न केला त्या काँग्रेसजवळ एकही तेजःपुंज, स्वयंप्रकाशी नेता नसल्याने ती उभी राहण्यापूर्वीच कोलमडल्यासारखी आहे. राजकीय निरीक्षकांनाही चव्हाण नेमकी कोणती भूमिका घेतील हे सांगणे अवघड आहे. मूग गिळून बसतील तरी चालणार नाही आणि काही कृती करतील तरीही त्यातून त्यांचे नेतृत्व तग धरू शकेल असे विशेष काही निघू शकणार नाही, अशा विचित्र अवस्थेत आज चव्हाण आहेत. 'त्रासदायक तप' काढणारे चव्हाण आता हे 'त्रासदायक वर्ष' कसे निभावून नेतात ते पाहायचे.

निवडणुकनिकालाचा पहिला तडाखा विरून गेल्यावर शांत डोक्याने विचार केला तर जनता पक्षाची अवस्था जेवढी वाईट वाटते तेवढी काही ती वाईट नाही असे दिसते. अर्थात तसे हे समाधान नकारात्मकच आहे; पण पराभवातही थोडासा दिलासा देणारे आहे इतकेच. कर्नाटकमध्ये जनता पक्षाने ५९ जागा जिंकल्या आहेत. सत्तास्पर्धेच्या राजकारणामध्ये या जागा तोटक्या असल्या तरी जनता पक्षाची कर्नाटकमधील संघटनशक्ती आणि जनता पक्षाच्या घटकपक्षांचे पूर्वीचे बळ यांच्या तुलनेत जनता पक्षाची आजची अवस्था उजवी आहे. कर्नाटकपेक्षाही आंध्रप्रदेशामध्ये विरोधीपक्षाने पूर्वी मार खाल्ला आहे. आज जनता पक्षामध्ये असलेल्या घटकपक्षांना आंध्रप्रदेशात पूर्वी जवळजवळ काहीच स्थान नव्हते. १९७२ मध्ये तर या साऱ्या घटक पक्षांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी कमी होती. आज त्याच आंध्र प्रदेशामध्ये जनता पक्षाचे ६० आमदार आहेत. आसाम विधानसभेच्या १२६ जागा आहेत. कर्नाटक–आंध्रमध्ये झंझावाती यश घेणाऱ्या इंदिरा काँग्रेसला येथे केवळ आठ जागांवर समाधान मानावे लागले आहे; तर स्वतःला अधिकृत काँग्रेस म्हणविणाऱ्या रेड्डी–चव्हाण काँग्रेसला दुसरे स्थान मिळाले आहे. हातची सत्ता गेली हे खरे असले तरी इंदिरा काँग्रेस निदान या राज्यात तरी आपल्या मागे आहे असे नकारात्मक समाधान तेथील काँग्रेसवाल्यांना आहे. १२६ सभासदांच्या सभागृहात ५३ जागा जिंकून जनता पक्षाने जोरदार मुसंडी मारली असून सत्तेवर हक्क सांगितला आहे. जनता पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नसले तरी सत्तेवर हक्क सांगण्याइतके सामर्थ्य त्याने पैदा केले असून मित्रांच्या सहकार्याने सत्ता संपादन केली आहे. सुस्थिर नसले तरी स्थिर सरकार तेथे अस्तित्वात आले आहे. अरुणाचल प्रदेशामध्ये जनता पक्षाने बहुमत मिळविले असून सत्ता संपादन केली आहे. मेघालयामध्ये वीस जागा जिंकणाऱ्या काँग्रेसने ६० सभासदांच्या सभागृहामध्ये अग्रस्थान पटकावले असले तरी त्यांच्या हाती सत्ता येणे कठिण दिसते. सर्वपक्षीय पहाडी परिषद (१६ जागा) आणि पहाडी राज्य संयुक्त लोकशाही पक्ष (१४) यांनी काही अपक्षांचा पाठिंबा मिळवून सत्ता संपादन करण्यात यश मिळविले तरी अथवा अपक्षांचे मदतीने काँग्रेस सत्तेवर आली तरी परिस्थिती अस्थिरच रहाणार आहे. अर्थात–अस्थिरतेची सगळ्या कमाल मर्यादा आजपर्यंत जराही अस्थिरता माहीत नसलेल्या महाराष्ट्रात पहावयास मिळणार आहे. सध्याच्या परिस्थितीवरून वर्ष–दोन वर्षे तरी महाराष्ट्रातील सत्तेची खुर्ची दोलायमान रहाणार असे दिसते आहे. □

चित्रपट–परीक्षण

# खट्टा-मीठा

### थोडा गोड, बराच आंबट

सदानंद बोरसे

---

'Yours Mine and Ours' या इंग्रजी चित्रपटातील सहासष्ट टक्के भाग म्हणजे 'तुझे आणि माझे' घेऊन बासू चटर्जींनी खट्टामीठा सादर केला आहे.

होमी मिस्त्री ( अशोककुमार ) आणि त्याचे चार सुपुत्र–फली (रविराज), जाल ( देवेंद्र ), रुसी ( रणजित चौधरी ) आणि पिलू ( मा. राजू ) हा एक परिवार म्हणजे 'तुझे आणि माझे' मधील एक. फली कायम आपला खटारगाडी दुरुस्त करीत बसणार, तर जाल नेहमी गिटार कुरवाळीत राहणार. रुसी खेळाडू–तो आपला 'हाः हुः' असे बुभुत्कार काढीत हातपाय झाडण्याचा प्रकार म्हणजेच ज्यूडोचा सराव करीत असणार. पिलू अगदीच लहान; त्यामुळे अजाण; त्यामुळेच जाणत्यांच्या जाणीवपूर्वक खोड्या करण्याचा जन्मसिद्ध हक्क मिळालेला आणि तो कसोशीने बजावणार. 'तुझे आणि माझे' मधील उरलेले कुटुंब म्हणजे नरगिस ( पर्ल पदमसी ) आणि तिची तीन अपत्ये–फिरोज ( राकेश रोशन ), फरदूम ( विमल साहू ) आणि फ्रेमी ( प्रीती गांगुली ) आपल्या कॉलेजातील झरीन केरावालावर ( बिंदिया गोस्वामी ) प्रेम करणे हा फिरोजचा एकमेव उद्योग; तर फरदूम कायम मारामाऱ्यांमध्ये गुंतलेला. सिनेमे व दिवास्वप्ने पाहणे आणि आपल्या वाढत्या आकारमानाची व लग्नाबाबतच्या भीषण भवितव्याची काळजी करण्यात फ्रेनी वेळ घालविणार. होमी आणि नरगिसच्या समाईक मित्रांमुळे–सोलीभाई ( डेव्हिड ) व त्याच्या बायकोमुळे दोघांचे लग्न होते आणि ही सारी नमुनेदार पात्रे एकत्र येतात. सोलीभाई व त्यांच्या बायकोचा या उद्योगातील वा रिकाम्या उद्योगातील उत्साह वा पुढाकार पाहता त्यांनी होमी व नरगिसचे लग्न लावून देण्याचा साधासुधा नव्हे तर गोविंदविडाच उचलला असावा. या लग्नाने होमी व नरगिस यांची मुले व घरादारासकट सर्व स्थावरजंगम मालमत्ता समाईक होते. घरासारख्या स्थावर गोष्टी ही समाईक मालकी बिनतक्रार मान्य करतात; पण मन, भावना वगैरे चिजा जवळ बाळगून असल्याने मुलांना ही मालकी मान्य नसते. मग निरनिराळ्या प्रसंगांमधून नरगिसची मुले व होमी, होमीची मुले व नरगिस आणि होमीची मुले व नरगिसची मुले यांचे भावनात्मक ऐक्य, मने जुळणे वगैरे प्रकार घडून दळणवळणाचे पक्के मार्ग साऱ्यांमध्ये प्रस्थापित होतात व दोन्ही परिवार एक होऊन सुखाने नांदू लागतात. या सगळ्यांमध्ये फ्रेनीचे लग्न होऊन जाणे आणि फिरोज–झरीन यांचे लग्न होऊन झरीन येणे हा एक बारीक फायदा होऊन जातो. त्या निमित्ताने चित्रपटातही काही खुरट्या विनोदाच्या ( अर्थातच फ्रेनीचा नवरा दारा-देवेन वर्मा व सासू ) आणि कोरड्या संघर्षाच्या ( अर्थात झरीनचा बाप मि. केरावाला– प्रदीपकुमार ) रोपट्यांची बी–बियाणी पेरता येतात.

बासूदांनी आतापर्यंत रजनीगंधा, छोटीसी बात, चितचोर, प्रियतमा व स्वामी या सर्व चित्रपटांमधून स्त्री–पुरुषांचे प्रेम व एकमेकांबद्दलचे आकर्षण याच विषयाचे निरनिराळे पैलू हाताळले. मुख्यतः स्त्रीच्या मनाच्या लंबकाची कधी आपण होऊन होणारी, तर कधी एखाद्या धक्क्याने घडणारी, कधीकधी फसवीसुद्धा आंदोलने हा त्यांचा खास विषय वाटावा असेच हे बहुतेक चित्रपट; त्यामुळे प्रियतमाचा अपवाद वगळता सगळीकडेच प्रेमाचा त्रिकोण आकारलेला. या पार्श्वभूमीवर त्यांनी 'खट्टा–मीठा'साठी निवडलेली कथा एकदम निराळी वाटली. फार्सिकल वळणाच्या या कथेला अत्यंत हलकीफुलकी हाताळणी आवश्यक होती. साधेसुधे प्रसंगही अशा चुरचुरीत पद्धतीने फुलविण्याबद्दल बासूदा प्रसिद्ध आहेतच. सुरुवातीला त्यांनी या चित्रपटालाही अशीच treatment दिलेली आहे. होमी व नरगिसने एकमेकांना पाहण्याचा प्रसंग व त्याआधी दोघांची उडालेली धांदल, आपले अमिताभ बच्चनशी लग्न झाल्याचे फ्रेनीला पडलेले स्वप्न, सगळ्या मुलांमध्ये आंघोळ, जेवण यांसारख्या प्रकारांमध्ये उडणारे खटके, त्यांनी एकमेकांच्या काढलेल्या खोड्या असे प्रसंग त्यांनी आपल्या नेहमीच्या खुमासदार पद्धतीने अनेक बारकावे टिपीत रंगविले आहेत; पण ही खुमारी शेवटपर्यंत काही टिकत नाही. कारण फिरोज–झरीनचे प्रेम, लग्न झाल्यानंतर 'परिवार का सुख बचाये रखने के लिए' झरीनने पुन्हा घरी जाणे, होमी मिस्त्रीने ताडताड जाऊन झरीनच्या वडिलांचे राणा भीमदेवी थाटात प्रेम व त्याचे महत्त्व याबद्दल घेतलेले बौद्धिक, एकुलत्या पोरीच्या कृतीनेही न मावळलेला पण होमी मिस्त्रीच्या बौद्धिकामुळे होणारा केरावालांचा हृदय पालट हा सगळा भाग बेगडी व खोटाखोटा वाटतो. चित्रपटाला भावनेची खोली, डूब, किनार, धार वा तत्सम काही तरी देण्याचा हा फोल प्रयत्न चित्रपटाचा हलका मूड उगाचच घालवून टाकतो आणि चित्रपट कंटाळाणा बनवतो. गरीब लडका व अमीर लडकीची मुहब्बत आणि या मुहब्बतीवर अमीरी कुर्बान वगैरे प्रकार आणि पारिवारिक प्रेमाचा पारंपारिक रंग किंवा गंज पाहिला की बासूदाही निर्मात्यांना फारच सांभाळून घेऊ लागल्याची खात्री पटते. 'मम्मी, ओ मम्मी' या गाण्यातून दाराचा आईजवळ लग्नासाठी चालणारा हट्ट, होमी मिस्त्रीचे गाडी चालविणे असले प्रसंग म्हणजे तर खास 'बच्चे लोगोंको हँसा हँसा कर लोटपोट कर देनेवाला' विदूषकी प्रकारच आहे. बासूदांनी संपूर्ण कथेत पारशी कुटुंब घेऊन कथेला एक झरथुष्ट्रीयन रंग दिला आहे. एक सापत्य हिंदू विधवा व एक सापत्य हिंदू विधुर यांचे लग्न असे दाखविणे म्हणजे एकदम विलायती मडमेला नऊ वारी नेसविण्यासारखे वाटल्याने त्यांनी हा सुवर्णमध्य काढला की काय कोण जाणे! मात्र पात्रांचे पोषाख, प्रार्थनापद्धती, लग्न, खाद्यपदार्थ, घरातील फर्निचर इत्यादी गोष्टींमधून हा रंग दिसतोही झकास; फक्त संवाद आणि बोलण्याची पद्धती ही पुरेपूर हिंदी आहे. अर्थात ही आपल्या बहुसंख्य प्रेक्षकांच्या सोयीसाठीच केलेली व्यवस्था असल्याने ती स्वीकारायलाच हवी. संवाद मात्र बासुदांनी खुसखुशीत लिहिले आहेत. उदाहरणार्थ– दारा पत्नीबद्दलच्या अपेक्षा

सिगताना म्हणतो, 'माझ्या अटी काही नाहीत हो; फक्त ती बाई असलो म्हणजे झालं!' किंवा स्वतःबद्दल म्हणतो, 'मी सिगारेट ओढत नाही, दारू पीत नाही, जुगार खेळत नाही. माझ्यात फक्त एकच खोड आहे–मी खोटं फार बोलतो!'

या चित्रपटाद्वारे पर्ल पद्मसी ही इंग्रजी नाटकामधून काम करणारी प्रसिद्ध अभिनेत्री प्रथमच रुपेरी पडद्यावर आली आहे. तिने नर्गिसची भूमिका केली आहे. प्रथम काही वेळ ती कॅमेऱ्यापुढे थोडीशी अवघडलेली वाटली. विशेषत: बोलण्यात काहीशी कृत्रिमता जाणवत होती; पण नंतर कॅमेरा समोर असल्याचा हा consciousness गेलेला आढळला आणि तिने अत्यंत सहजसुंदर व मोकळ्या अभिनयाचा प्रत्यय दिला. अशोककुमारासारख्या समर्थ अभिनेत्यांपुढेही तो स्वत:चा वेगळा ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटविण्यात यशस्वी झाली आहे. अशोककुमाराच्या होमी मिस्त्रीबद्दल काय लिहावे? काहीही न लिहिता त्याचे एकेक प्रसंग आठवून डोळ्यांपुढे आणणेच अधिक उत्तम. खट्टामीठातील गोड भागात सिंहाचा वाटा अशोककुमारचाच. एकमेकांना पाहुण्याचा प्रसंग. लग्न, मुलांच्या भांडणात सर्वांना सांभाळून घेणे, महिन्याच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी असे चित्रपटातील कित्येक प्रसंग पर्ल पदमसी व अशोककुमारने आपल्या अभिनयाने जिवंत करून टाकले आहेत. या दोघांना सगळ्या पोरांकडून सुरेख साथ मिळाली आहे. त्यातही प्रीती गांगुलीची फ्रेनी, रणजित चौधरीचा रुसी ऊर्फ pseudo ब्रूस ली आणि मा. राजूचा पिलू आघाडीवर. मा. राजूचे सतत 'ही: ही:' करून कृत्रिम हसणे मात्र खटकते. राकेश रोशन आता हिंदी चित्रपटसृष्टीत चांगलाच सीझनड झाल्याचे जाणवते. विदिया गोस्वामीने गोड दिसण्याचे, गोड हसण्याचे व थोडीशी आसवे गाळण्याचे काम इमानदारीत केले आहे. देवेन वर्माचा दाराही उल्लेखनीय.

चित्रपटाचा संगीतकार राजेश रोशन व गीतकार गुलजार, त्यामुळे या प्रांताबद्दल बऱ्याच अपेक्षा होत्या. राजेश रोशनने त्या थोड्याशा पूर्ण केल्या; पण गुलजारने मात्र घोर निराशा केली. 'मम्मी, ओ मम्मी, तू कब सास बनेगी, किंवा 'सन सन हवा चले, तेरे आँचल से उठके घटा चले' असल्या गुलजारचा कवी ते शब्दजुळारी या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पाच मानाव्या लागतील. चित्रपटाच्या मूडला साजेशी म्हणून अशी गाणी गुलजारने फक्त याच चित्रपटात दिली आहेत, असे असते तरी काही वाटले नसते, उलट गुलजारचे कौतुकच वाटले असते, पण 'पलकों की छाँव में)-मधील 'डाकिया डाक लाया' हे ऐकलेले गाणेही असेच भयंकर आहे. ते गुलजारचे नसू दे, अशी मी देवाजवळ प्रार्थनाही केली.

गाण्यांमध्ये 'थोडा है, थोडे की जरूरत है' या गाण्याचे 'टेकिंग सुरेख.' त्या वेळी प्रत्येक जण फुलवत असलेले स्वप्न प्रत्येकाची दाद घेऊन जाते. 'फ्रेनी, आय वॉंट टू सिंग ए साँग' या फ्रेनीच्या लग्नाच्या वेळी असलेल्या गाण्याचे टेकिंग छायाचित्राच्या दृष्टीने झकास.

तर असा हा बासू चटर्जीचा 'खट्टामीठा' अगदी अंगूर का दाना नाही; पण एक आंबटगोड बोर आहे, अर्थातच त्यात बी आहेच. प्रेक्षकांनी राम बनावे अन् हे बोर शबरीचे मानून स्वीकारावे. सध्याच्या घुमाकुळी हिंदी चित्रपटाच्या चौदा चौकड्यांच्या राज्यात दुसरी कसली अपेक्षा करणार? *

# भूमिका

## (The Role)

## एक सुन्न करणारा अनुभव

'सांगत्ये ऐका' या कै. हंसा वाडकरच्या आत्मचरित्रावरून काढलेला चित्रपट 'भूमिका.' एक चित्रपटात काम करणारी स्त्री आणि वेगवेगळ्या कारणांनी तिच्या आयुष्यात आलेले पुरुष हा विषय म्हटल्यानंतर त्याचा एखादा तथाकथित खळबळजनक, प्रक्षोभक चित्रपट बनवून एखाद्या नटीच्या अंगाप्रत्यंगांचे प्रदर्शन घडविणे सहज शक्य होते; पण श्याम बेनेगलसारख्या समर्थ दिग्दर्शकाच्या हातून ही कलाकृती घडल्याने तिचे अक्षरश: सोने झाले आहे.

श्याम बेनेगलच्या आधीच्या चित्रपटांमध्ये ज्याप्रमाणे ज्या ज्या भागात चित्रपट घडतो तेथील प्रादेशिक वातावरण जोपासले होते, त्याचप्रमाणे 'भूमिका'मध्येही चित्रपटाच्या सुरुवातीपासूनच मराठी वातावरण निर्माण केले आहे. चित्रपटाची सुरुवातच तमाशातील एका खणखणीत लावणीने होते. त्या लावणीचे शब्द हिंदी असले, तरी संगीतकार वनराज भाटियांनी दिलेली चाल, प्रीती सागरचा खडा टिपेचा आवाज आणि म्हणण्याचा ठसका आणि पडद्यावर या वेळी चालणारा स्मिता पाटीलचा नाच हे सगळे अस्सल मऱ्हाटी आहे आणि संपूर्ण चित्रपटभर हे मराठमोळेपण असूनही श्याम बेनेगलच्या treatment मधील खोलीने चित्रपट केव्हाच प्रादेशिकतेच्या पलीकडे पोहोचतो–त्याच्याआधीच्या चित्रपटांप्रमाणेच.

उषा (स्मिता पाटील) ही चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री. तिची आजी सुप्रसिद्ध गायिका; पण तिची आई शांताबाई मात्र आईची गायकी न चालविता लग्न करून संसारात रमण्याचे ठरविते. मुलीनेही गाण्याच्या वाटेला न जाता आपल्याप्रमाणेच संसार करावा अशी तिची अपेक्षा. उषा मात्र वडिलांच्या आकस्मिक मृत्यूने लहानपणीच चित्रपटात शिरते व त्या क्षेत्रात पुढे पुढे जाते. केशव दळवी (अमोल पालेकर) या तिच्यापेक्षा वयाने बऱ्याच मोठ्या असलेल्या गृहस्थाशी ती लग्न करते. त्यानंतर ओघानेच येणारे संशयचक्र. केशवला तिचा व तिच्याबरोबर काम करणाऱ्या हिरो राजनचा (अनंत नाग) संशय येऊ लागतो. त्यामुळे उषा घराबाहेर पडते आणि एका लॉजमध्ये येऊन उतरते. तेथे तिची योगायोगाने शेजारच्या खोलीत उतरलेल्या विनायकराव काळे (अमरीश पुरी) नावाच्या एका खानदानी जमीनदाराशी ओळख होते आणि ती त्याच्याबरोबर त्याच्या गावी जाते; पण त्याच्या घरातील कोंडलेल्या वातावरणाला कंटाळून ती केशवला पत्र टाकून आपली सुटका करून घेते. परतल्यानंतर वेगवेगळे जीवन जगण्याचा केशवने व तिने निर्णय घेतलेला असतानाच चित्रपट संपतो. मध्यंतरी एकदा तिच्या आयुष्यात सुनील (नासिरुद्दीन शाह) हा एक अफलातून तरुण येऊन जातो.

ही कथा उषाची आहे. साहाजिकच स्मिता पाटीलला केंद्रस्थान व संपूर्ण वाव मिळाला

आहे. या गुणी अभिनेत्रीने त्याचा वापरही पुरेपूर करून घेतला आहे. किशोरवयातील अल्लडपणा, केशवशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्यानंतरचा हट्टीपणा, वयाबरोबर येत जाणारी समज आणि तरीही असलेला मनस्वीपणा आणि शेवटी ओंजळीत उरलेली भग्नता हे वेगवेगळ्या वेळचे भाव तिने अतिशय सुरेख पकडले आहेत. त्याच वेळी बाकीचे कलाकारही कुठेही रेसभरसुद्धा कमी पडलेले नाहीत. सर्वाधिक लक्षात राहतो तो अमोल पालेकर. त्याची साध्या, भाबड्या (किंवा बावळट) मध्यमवर्गीय तरुणाची image मोडण्याची संधी त्याला या चित्रपटात मिळाली आणि अमोल ती मोडण्यात पूर्णपणे यशस्वी झाला आहे. आपल्या कमीपणाची जाणीव, बायकोच्या पैशावर जगण्याची खंत, स्वतःचा नाइलाज, बायकोबद्दलचा संशय हे सारे त्याच्या जळत्या नजरेतून काही न बोलतासुद्धा पेटून बाहेर पडते, त्याच्या सिगरेट पेटविण्यातून अन् चिरडण्यातून जाणवते. लहानपणीच्या उषाला 'माझ्याशी लग्न कर' म्हणून चिडवणारा केशव, त्याचवेळी उषाच्या आईबद्दल त्याला वाटणारी सूक्ष्म अभिलाषा, आपल्या उपकारांच्या ओझ्याने उषाच्या कुटुंबाला दबविणारा केशव, नंतर उषाच्या कर्तृत्वाने दबलेला आणि नवरेपणाच्या अहंभावाने उफाळणारा केशव, उषाबद्दल वाटणारे प्रेम आणि त्याच वेळी तिच्याबद्दल वाटणारा संशय या कात्रीत सापडलेला केशव, 'बायकोने सिनेमात काम करू नये' असे मनात असतानाच पैशासाठी स्वतःच तिच्या वतीने करार करणारा नटीचा नवरा केशव अमोलने समरसून उभा केला आहे.

चित्रपटातील दुसरा गृहस्थ–राजन–उषाचा हिरो. उषाच्याच भाषेत सांगायचे तर 'जिसने हमेशा मुझे दिया, लेकिन लिया कुछ नहीं' असा एक सरळ भला गृहस्थ. उषावर प्रेम असूनही उषाचा विवाहितपणा, लोकमत वगैरे वगैरे बंधने तोडण्याची तयारी नसल्याने तिला फक्त कोरडी सहानुभूती देणारा राजन उभा करणे फारसे कौशल्याचे नव्हते आणि तो यथायोग्य उभा करण्यात अनंत नागला फारसे कष्टही पडलेले नाहीत.

उषाच्या आयुष्यात येणारा तिसरा पुरुष सुनील. हे एक वादळी व्यक्तिमत्त्व. माणसाच्या शरीरात हृदयाबरोबरच डोके नावाची चीज अस्तित्वात असते, याची अचूक जाणीव असलेला आणि आपल्या डोक्याने इतरांच्या मनांचा योग्य उपयोग करून घेणारा हा एक परखड बुद्धिवादी तरुण. 'आज, आताचा क्षण तेवढा खरा. तो भरभरून जगावा, उपभोगावा' असे स्वच्छ ऐहिक तत्त्वज्ञान मानणारा आणि मृत्यूबद्दल एक अनामिक ओढ असणारा सुनील प्रत्यक्षात मात्र अतिशय सामान्य निघतो. उषा जेव्हा खरोखरीच आत्महत्या करण्याचा प्रस्ताव त्याच्यापुढे ठेवते, तेव्हा हा इसम तिच्यासाठी एक सुकलेला गजरा आणि 'अल् विदा'ची चिठ्ठी ठेवून निघून जातो त्याच्या मनस्वीपणामुळेच त्याच्याकडे ओढल्या गेलेल्या उषाजवळ पुन्हा आठवणीच उरतात. सुनीलचे काम केले आहे नासिरुद्दीन शाहने. दाढी, पोषाख आणि बारीक काडीचा चष्मा हे व्यक्तिमत्त्व त्या तरुणाला साजेसेच होते; पण त्याचे एकसुरी बोलणे मात्र पुढे पुढे कंटाळवाणे वाटू लागते.

उषाच्या आयुष्यात येणारा चौथा आणि चित्रपटातील शेवटचा पुरुष विनायकराव काळे–अमरीश पुरी. अत्यंत ओबडधोबड पण पहाडी व्यक्तिमत्त्व आणि भरदार खर्जातील आवाज असलेल्या या अभिनेत्याने खानदानी जमीनदार अक्षरशः जिवंत केला आहे. विशेषतः वाड्याबाहेर जाण्याचा हट्ट धरून बसलेल्या उषाच्या फाडकन थोबाडीत मारून तिला आपल्या घराण्याचे रीति-रिवाज समजावून सांगतानाचा प्रसंग आणि उषा वाड्यातून निघून जातानाचा खिळलेला दगडी विनायकराव मी कधीच विसरू शकणार नाही.

याव्यतिरिक्त अभिनेत्यांचा उल्लेख म्हणजे विनायकरावांचा मित्र (मोहन आगाशे), विनायकरावाची पक्षाघाताने विकलांग झालेली बायको (रेखा सबनीस), निर्माता हिरालाल (कुलभूषण खरबंदा) उषाची मुलगी आणि छोटी उषा छोट्या भूमिकांमधूनही लक्षात राहिलेले हे लोक.

या सर्व व्यक्तिरेखा अत्यंत ठसठशीतपणे उभ्या करणे आणि त्यांचे आपापसातील संबंध उलगडणे हे या सगळ्या अभिनेत्यांबरोबरच दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचेही कर्तृत्व. याखेरीज सेट आणि पार्श्वभूमीतून १९३५ ते १९६० पर्यंतचा काळ श्याम बेनेगलांनी उलगडला आहे. त्यांच्या चित्रपटांमध्ये वास्तव वातावरणनिर्मितीसाठी रेडिओचा वापर असतोच. या चित्रपटात त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या बातम्यांपासून प्रधानमंत्री म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंच्या उल्लेखापर्यंत रेडिओचा वापर करून काळाची सुरेख जाणीव करून दिली आहे. चित्रपटांच्या शूटिंगमध्येही चित्रपटांच्या type च्या क्रमामधून त्यांनी हेच काळाचे भान राखले आहे. उषाच्या जीवनाशी समांतर अथवा पूर्णतः विरोधी प्रसंगांचे तिच्या चित्रपटांतील शूटिंग हाही त्यांच्या मांडणीतील कौशल्याचा एक भाग. तिच्या चित्रपटांची नावेसुद्धा–अग्निपरीक्षा, बदनसीब–अशी अत्यंत सूचक निवडली आहेत. चित्रपटात वापरलेले फ्लॅश बॅकही एकाच फिल्टरमध्ये वापरल्याने वेगळे वाटतात आणि प्रभावीही वाटतात. फक्त लहानपण थोडेसे जास्तच लांबल्यासारखे वाटले आणि काही जागी एकच फिल्टर थोडासा बोअर वाटला. चित्रपटात फ्लॅश बॅक सांधण्यासाठी केलेला लावणीचा वापर संगीत आणि त्या वेळचे नृत्य दोन्ही दृष्टींनी अफलातून.

चित्रपटाला संगीत आहे वनराज भाटियांचे. 'मूंदर बाजे, बाजे रे' ही चीज, प्रीती सागरच्या आवाजातील 'तुम्हारे बिन जी ना लगे घर में' हे गीत आणि लावणी असे मोजके काम असूनही बऱ्याच दिवसांनी एक सुरेख कारागिरी ऐकल्याचा आनंद मिळाला.


चित्रपटाचे पं. सत्यदेव दुब्यांचे संवाद आहेत, ते सारेच प्रसंग जिवंत करणारे. त्यातसुद्धा 'आई, आजी, जीजीबाई' अशा संबोधनांमधून मराठीपण सांभाळले आहे. 'यहाँ बिस्तर बदलते हैं, रसोईघर बदलते हैं, मर्दों के मुखवटे बदलते हैं; लेकिन मर्द सब एक जैसे ही होते हैं।' असे काही तर त्या त्या प्रसंगात अंगावर अक्षरशः शहारे आणतात.

चित्रपटात प्रथमपासूनच एक सुन्नपणा मनाची पकड घेतो आणि राजनचा फोन ऐकताना रिसीव्हर हातातून गळून पडलेली उषा आणि फोनमधून उमटणारे राजनचे 'हॅलो, हॅलो' उमटत असतानाच चित्रपटाचा शेवट तो सुन्नपणा एका आत्यंतिक टोकाला नेऊन पोचवतात. ☐

# एक देश, एक जनता

एकत्र काम करण्याचा आनंद





## रुग्णालयात एकत्र

डॉ. दोरायस्वामी यांना आपण दिल्लीत दीर्घकाळ राहू, अशी अपेक्षा नाही. पण गेल्या १५ वर्षांत त्यांनी बरेच मित्र गोळा केले आहेत. ते आपल्या कामात तल्लीन असतात आणि त्यांना उसंत घ्यायला पण वेळ मिळत नाही.

त्यांच्या बरोबर काम करणाप्या डॉक्टरांत, हुशार तरुण तरुणी आहेत. ही मंडळी घरीं निरनिराळया भाषां बोलतात, कारण ही मडळी तेथे, भिन्न भिन्न ठिकाणांहून आलेली आहेत.

पण रुग्णालयात ते सर्व एकच भाषा बोलतात आणि ती म्हणजे प्रेमळपणाची भाषा. प्रेमळपणाला कोणतेहि प्रतिबंध नसतात.

davp 77/49

प्रतिबंधाच्या कल्पना आळशी लोकांच्या मनात जन्म घेतात. त्यांना दूर करण्यास मदद करा